

मुरूड : भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त उत्साही कोळी मुलांनी समुद्रावर ध्वज घेऊन आनंद साजरा केला.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक १९०

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ सोमवार, २६ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


राम प्रहर

**मंगळवारचा अंक नाही**

**प्रजासत्ताक दिनानिमित्त**

'राम प्रहर'च्या कार्यालयास सोमवारी सुट्टी असल्यामुळे मंगळवार (दि. २७)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा! –मुख्य संपादक**

# पनवेल महापालिकेतील महायुतीच्या गटनेतेपदी नितीन पाटील यांची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक २०२६ निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने दणदणीत विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले. या निवडणुकीत भाजप महायुतीच्या एकूण ५९ उमेदवारांनी विजय मिळवत पुन्हा एकदा पनवेल महानगरपालिकेवर भक्कम सत्ता स्थापन केली आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी (दि.२५) नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीच्या गटनेतेपदी नितीन जयराम पाटील यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.



या बैठकीस भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शिवदास कांबळे, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांच्यासह महायुतीचे सर्व नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी सर्व उपस्थितांनी गटनेते नितीन पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भाजपचे ५५, शिवसेनेचे दोन आणि **(पान २ वर..)**

# पद्म, शौर्य पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्रातील लोकनाट्य तमाशा अन् कृषी क्षेत्राला बहुमान; देशातील ९८२ जणांना विविध पदके

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशातील मानाच्या 'पद्म' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. सन २०२६ साठीच्या पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कारांच्या मानकरी ठरलेल्या ४५ मान्यवरांची यादी केंद्र सरकारने प्रसिद्ध केली आहे.

**महाराष्ट्रातील ११ मान्यवरांचा समावेश**



रघुवीर खेडकर | भिकल्या धिंडा | श्रीरंग लाड | आर्मिदा फर्नांडीस

विविध क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. तर देशातील पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील एकूण ९८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील एकूण ८९ अधिकारी व कर्मचारी यांना विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत.

महाराष्ट्रातील ११ जणांना पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यामध्ये, लोकनाट्य क्षेत्रात तमाशा कलाकार रघुवीर खेडकर आणि कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीरंग लाड यांना यंदाच्या वर्षीचे पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. यांसह पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका आणि आर्मिंदा फर्नांडीस यांनाही पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

# यंदाच्या प्रजासत्ताक दिनी ऑपरेशन सिंदूरची थीम

**नवी दिल्ली :** देशभरात प्रजासत्ताक दिनाची जोरदार तयारी सुरू आहे. संपूर्ण देशात यावेळी ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला जीआल. याच दिवशी भारतीय संविधान लागू झाले होते. म्हणजे एका अर्थी २६ जानेवारी १९५० रोजीपासून देशात सार्वभौव, लोकशाही गणराज्य राष्ट्राची स्थापना झाली होती.

दरम्यान, यावेळचा प्रजासत्ताक दिवस खूपच विशेष असणार आहे. या दिवशी नवी दिल्लीच्या कर्तव्य पथावर भारतीय हवाई दल वेगवेगळ्या हवाई कसरती दाखवणार असून ऑपरेशन सिंदूरच्या थिमवर या कसरती असणार आहेत. या कसरतींमध्ये भारताच्या हवाई दलात असलेली राफेल, सुखोई–३० मिग–२९ यासारखी लढाऊ विमाने सहभागी होतील. .दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील राजधानी दिल्लीतील कर्तव्य पथावर प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य अशा परेडचे आयोजन करण्यात आले आहे.

# मालाड रेल्वेस्थानकावर युवकाची हत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मालाड रेल्वेस्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर काल घडलेल्या हत्येप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

लोकलमधून उतरताना झालेल्या किरकोळ भांडणातून एका प्रवाशाची धारधार शस्त्राने भोसकून हत्या करण्यात आली होती. या घटनेत अलोक सिंग या प्रवाशाचा मृत्यू झाला. लोकलमधून उतरत असताना दोघांमध्ये वाद झाला आणि या वादाचं रुपांतर थेट हाणामारीत झालं. या वेळी आरोपीने अलोक सिंग यांच्या पोटात धारधार शस्त्र खुपसल्याने ते गंभीर जखमी झाले आणि उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.




आरोपी ओमकार शिंदे | मयत अलोक सिंग

दरम्यान, या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. रेल्वे पोलिसांनी स्थानकातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आणि आरोपीला ताब्यात घेतलं. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव ओमकार एकनाथ शिंदे (वय २७) असून तो मालाड पूर्वेकडील कुरार व्हिलेज परिसरात राहणारा आहे. त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# बांगलादेशात आणखी एका हिंदूची निर्घृण हत्या

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशात आणखी एका हिंदूला जिवंत जाळून ठार करण्यात आले आहे. नरसिंगदी जिल्ह्यात एका गॅरेजमध्ये एका २३ वर्षीय हिंदू तरुणाला जाळून ठार मारण्यात आलं आहे. ही एक पूर्वनियोजित हत्या असल्याचा आरोप केला जात आहे.



मृत व्यक्तीची ओळख चंचल चंद्र भौमिक अशी झाली असून, तो अनेक वर्षांपासून त्या गॅरेजमध्ये काम करत होता. तो मूळचा कुमिल्ला जिल्ह्यातील लक्ष्मीपूर गावाचा रहिवासी होता आणि कामासाठी नरसिंगदी येथे राहत होता. ही घटना नरसिंगदी पोलीस लाइन्सजवळील मशिद मार्केट परिसरात घडली. प्रत्यक्षदर्शी आणि स्थानिक सूत्रांनुसार, शुक्रवारी रात्री उशिरा ही घटना घडली, जेव्हा चंचल गॅरेजमध्ये झोपला होता. हल्लेखोरांनी दुकानाच्या शटरवर बाहेरून पेट्रोल टाकून आग लावली, ज्यामुळे आगीच्या ज्वाला वेगाने आत पसरल्या.

घटनेशी संबंधित व्हिडिओमध्ये एक व्यक्ती दुकानाबाहेर आग लावताना दिसतोय, त्यानंतर काही क्षणांतच आगीने गॅरेजला वेढले. याची माहिती मिळताच, स्थानिक रहिवाशांनी अग्निशमन दलाला कळवले. आग विझवल्यानंतर, गॅरेजच्या आतून चंचल यांचा जळालेला मृतदेह बाहेर काढण्यात आला.

# आकुर्ली मालेवाडी येथे लाडक्या बहिणींचा मेळावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली मालेवाडी येथे शनिवारी (दि.२४) रुक्मिणी महिला मंडळ, कुळस्वामिनी महिला मंडळ आणि गावदेवी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाडक्या बहिणींचा मेळावा झाला.

या मेळाव्याला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे नेरे मंडल अध्यक्ष व आदई पंचायत समितीचे उमेदवार भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व भाजपचे ज्येष्ठ नेते संजय पाटील, नेरे जिल्हा परिषद चे उमेदवार आत्माराम भस्मा नवनिर्वाचित नगरसेवक संतोष शेट्टी, रवी जोशी, सरपंच सचिन पाटील यांच्यासह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, **(पान २ वर..)**

# 'मन की बात'चा १३०वा कार्यक्रम

## पंतप्रधानांकडून विविध विषयांचा आढावा

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजेच रविवारी (दि.२५) १३० व्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. पंतप्रधान मोदींनी प्रजासत्ताक दिनासह राष्ट्रीय मतदान दिन, भारताची आर्थिक प्रगती, देशाचे वाढते सामर्थ्य, प्रतिकूल निसर्गामुळे देशापुढे निर्माण झालेली आव्हानं, भारताची समृद्ध संस्कृती, वैश्विक कुटुंब आणि त्याच्यापुढील आव्हानं, पश्चिम बंगालची विवेकानंद लोक शिक्षा निकेतन संस्था, देशातली स्वच्छता मोहीम, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन, विविध प्रयोग करणारे शेतकरी आदी अनेक विषयांचा आढावा घेतला.









# जंजिरा किल्ल्याची नूतन जेट्टी खुली नसल्याने हजारो पर्यटक किल्ला न पाहता परतले

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

सलग सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील काशीद, मुरूड बीचवर पर्यटकांची मोठी मांदियाळी उतरल्याचे शनिवारी ते सोमवार सुटी असल्याने दिसून आले. मुंबई– पुणे, ठाणे, पश्चिम महाराष्टातुन असंख्य पर्यटक दीपावली सुट्टी समुद्रकिनारी एन्जॉय करताना दिसले, परंतु मुरुडच्या प्रमुख आकर्षण जंजिरा किल्ला पर्यटकांना पाहता आला नाही कारण पर्यटकांची गर्दी व किल्ल्याच्या गेटवर अरुंद जागा असल्याने पर्यटकांना बोटीतच बसून राहावे लागत होते. बोटी ताटकळत उभ्या राहत असल्याने पर्यटक किल्ला न पाहतच परतले .जर किल्याची नूतन जेट्टी पूर्ण तयार आहे .परंतु पर्यटकांसाठी खुली न केल्याने पर्यटक नाराज आहेत ,त्या जेटीवर ५०० पर्यटक सोबत उतरू शकतात व बोटी जलद वाहतूक करू शकतात नूतन जेटी खुली करण्याची मागणी होत आहे.



पर्यटकांच्या वर्दळीने जंजिरा जलदुर्ग गजबजला आहे. राजपुरी जेट्टी, खोरा बंदर जेट्टी, दिघी बंदर जेट्टीवरन पर्यटकांना जंजिऱ्यात जाण्याची जल प्रवासाची सुविधा असून असंख्य पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी येताना दिसत आहेत. सध्या हवामान उत्तम असून पर्यटनाला अनुकूल आहे.काशीद, नांदगाव, बारशिव समुद्रकिनाऱ्यावर येणारे विविध भागांतील पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी हमखास येतात असे दिसून आले. अनेक दिवस जंजिऱ्यावर पर्यटकांची संख्या रोडावली होती.

पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी रविवारी सकाळी सांगितले की, शनिवारी, रविवारी दोन दिवसात जंजिरा पाहण्यासाठी सुमारे ५ हजार पर्यटकांनी भेट दिली. जंजिऱ्यात प्रवेश करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला २५ रुपये तिकीट असून १५ वर्षा खालील मुलांना विनामूल्य प्रवेश आहे. ऑनलाईन तिकीट काढल्यास २० रुपये तिकीट आहे अशी माहिती येलीकर यांनी दिली. नांदगाव येथील सिद्धिविनायक देवस्थान, मुरूड येथील श्री दत्त देवस्थान, साळाव येथील गणेश देवस्थान ला देखील पर्यटक भेटी देऊन दर्शनाचा लाभ घेत आहेत.

मुरुड समुद्रकिनारी नुकतेच सुरु झालेले पार्किंग मुले पर्यटकांची उत्तम सोया झाली आहे .पर्यटक हॉटेल मधून पार्किंगमध्ये येतात २ पायऱ्या उतरल्यावर समुद्राच्या लाटांचा आनंद घेतात .किनारा सुशोभीकरांचा परिणाम पर्यटक वाढीवर नकीच झाला आहे .पर्यटकांनी २ दिवस राहावे यासाठी पालिकेने पदामदुर्ग किल्ल्यात जयवहतूक सुरु करणे गरजेचे आहे ,मुरुडच्या साईड सिन पाहण्यासाठी पालिकेची गाडी असली पाहिजे ,दोन्ही किल्ले ,कुंद्यामांदाड लेणी ,दत्त मंदिर ,इदगा ,गारंबी हि स्थळे पाहण्यासाठी नियोजन होणे गरजेचे आहे.

## वाशिवली, बोरीवली, कैरे शिवाजीनगर, आदिवासी वाड्यांमध्ये भव्य प्रचार रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सावरोली जिल्हा परिषद मतदारसंघात महायुतीच्या प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे जि.प. उमेदवार ज्ञानेश्वर गायकवाड आणि भाजपचे पंचायत समिती वाशिवली गणातील उमेदवार गौरी गडगे यांच्या प्रचाराचा शुभारंभ आई गावदेवी भवानी मंदिर, वडगाव येथून करण्यात आला. यानंतर वाशिवली, बोरीवली, कैरे शिवाजीनगर तसेच आदिवासी वाड्यांमध्ये भव्य प्रचार रॅली काढण्यात आली.

प्रचाराच्या दुसऱ्याच दिवशी ही रॅली यात्रेसारखी होत परिसर घोषणांनी दुमदुमून गेला. या रॅलीत महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिकांसह हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधत ५ फेब्रुवारी रोजी महायुतीला मतदान करून सेवा करण्याची संधी द्या, असे आवाहन उमेदवारांनी केले.

विकास, रोजगार आणि जनतेच्या समस्या सोडवणे हेच महायुतीचे ध्येय असून टक्के समाजकारण आणि टक्के राजकारण या तत्वावर काम करण्याचा निर्धार या वेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गविंद बैलमारे, मा. सभापती विश्वनाथ पाटील मा. सरपंच वडगाव एम. के गडगे, बंड्या ठोसर, विनोद भोईर, संदेश पाटील, विलास पाटील, वैभव मुंढे, रवी दुर्गे, संदेश शिंदे, दशरथ पाटील, संदीप पाटील, राजेश पाटील वाशिवली, मदन ठोंबरे. संदेश मालकर, संतोष पारिंगे सदस्य, वाशिवली शिवाजी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत पाटील वसंत पाटील आदी प्रचार रॅली समवेत हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.



## नवी मुंबईत पर्यावरणशील दृष्टीकोनातून गणेशमुर्तींचे विसर्जन

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माघी गणेशोत्सवात प्रतिष्ठापना केलेल्या प्राधान्याने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीमूर्तींचे विसर्जन आपल्या नजिकच्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे तसेच शाडूच्या मूर्तींचेही विसर्जन पर्यावरणशील दृष्टीकोन जपत कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले होते.



त्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमूर्ती विसर्जनासाठी नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या ठिकाणी २२ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती केली होती. परिमंडळ उपआयुक्तांच्या नियंत्रणाखाली सर्व विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त आणि त्यांची यंत्रणा सज्ज ठेवण्यात होती.

त्यास अनुसरुन संपूर्ण महापालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सवातील एकूण १४३० श्रीमूर्तींचे विसर्जन झाले. त्यामध्ये कृत्रिम विसर्जन तलावात ६८ शाडूच्या आणि ७७० पीओपीच्या अशा ८३८ श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.यामध्ये कृत्रिम विसर्जन तलावात बेलापूर विभागात १०६ पीओपी मूर्ती, नेरुळ विभागात १००, वाशी विभागात ८२, तुर्भे विभागात ७०, कोपरखैरणे विभागात ९५, घणसोली विभागात २००, ऐरोली विभागात ८४ व दिघा विभागात ३३ अशा प्रकारे आठ विभागांत २२ कृत्रिम विसर्जन तलावांवर एकूण ७७० पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली महापालिका क्षेत्रात २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन स्थळे निर्माण करण्यात आली होती. विद्युत व्यवस्थाही चोख ठेवण्यात आली होती. विसर्जन स्थळावरील ओले व सुके निर्माल्य लगेच उचलून नेण्यासाठी निर्माल्य वाहतूक वाहने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली सज्ज होती. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य पथकेही कार्यरत होती. तसेच अग्निशमन जवान आणि स्वयंसेवकही कार्यरत होते.

नवी मुंबई महानगरपालिकेने सर्व २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या कृत्रिम तलावांचा पर्याय उपलब्ध करून दिलेला असल्याने नागरिकांनी कृत्रिम तलावांमध्ये श्रीमूर्तींचे विसर्जन करून पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपला. महानगरपालिकेने केलेल्या सर्व प्रकारच्या चोख व्यवस्थेमुळे माघी गणेशोत्सवातील श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळा सुनियोजित पध्दतीने निर्विघ्नपणे पार पडला.

## लोकशाहीच्या बळकटीकरणात मतदारांचा सहभाग महत्त्वाचा –जिल्हाधिकारी किशन जावळे

**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

लोकशाही बळकटीकरणात मतदारांचा सहभाग महत्त्वाचा असून मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावणे आवश्यक आहे. नवं मतदारांनी अन्य युवकांना तसेच दिव्यांग व्यक्तींना मतदार नोंदणी आणि मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.





जिल्हाधिकारी कार्यालयात १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, जे.एस.एम. कॉलेजच्या प्राचार्य सोनाली पाटील, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दिव्यांग आयकॉन साईनाथ पवार, युथ आयकॉन तपस्वी गोंधळी आदी उपस्थित होते.

लोकशाही बळकट करण्यासाठी योगदान देणाऱ्या पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन करून जिल्हाधिकारी म्हणाले, मतदार यादी हे मतदान प्रक्रीयेचा आत्मा आहे. मतदान प्रक्रीया ही लोकशाहीचा आत्मा आहे. नवमतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे, त्यांची मतदार म्हणून नोंदणी व्हावी, हा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यामागील उद्देश आहे. मतदार यादी सर्वसमावेशक व्हावी यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनाने विशेष प्रयत्न केले. महिला, दिव्यांग, आदिवासी, कामगार आणि दुर्गम भागातील नागरिकांच्या मतदार नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. युवकांची नोंदणी करून त्यांचा मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग वाढावा यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे. ज्यां नवमतदार यांनी मताधिकार बजावला आहे त्यांनी हे जनजागृती करावी. तसेच मतदार नोंदणीसाठी युवक व युवतींनी प्रोत्साहित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी यावेळी केले.

उत्कृष्ट कामगिरीसाठी अधिकारी व कर्मचारी सत्कार

जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी, प्रविण पवार, उत्कृष्ट वृत्तपत्र दैनिक रायगड टाईम्सचे संपादक राजन वेलकर, उत्कृष्ट समन्वय अधिकारी,समन्वय अधिकारी मतदान यंत्र व्यवस्थापन, टपाली मतदान व मतमोजणी, समन्वय अधिकारी निवडणूक खर्च नियंत्रण समिती तसेच इतर विभागातील मतदार नोंदणी अधिकारी/सहायक मतदार नोंदणी अधिकारी/निवडणुक नायब तहसिलदार/महसूल सहायक अधिकारी/महसूल सहायक/शिपाई/डाटा एंन्ट्री ऑपरेटर/मतदान केंद्रस्तरीय अधिकारी/महाविद्यालय या अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

## रविवार ठरला प्रचारवार

### देवद परिसरात महायुतीकडून मतदारांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच रंगू लागली असून, भारतीय जनता पार्टी महायुतीच्या बाजूने पनवेल तालुक्यात प्रचाराला वेग आला आहे. पाली देवद जिल्हा परिषद गट आणि विचुंबे पंचायत समिती गणासाठी रविवारी (दि.२५) सुट्टीच्या दिवशी देवद परिसरात जोरदार प्रचार करण्यात आला.

जिल्हा परिषद उमेदवार प्राची जाधव आणि पंचायत समिती उमेदवार नीलम भिंगारकर यांनी देवद गावात आणि सोसायटी मधील घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत प्रचार केला. यावेळी त्यांच्यासोबत दैवत ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद वाघमारे, उपसरपंच साधना वाघमारे, शक्ती केंद्रप्रमुख कैलास वाघमारे, निलेश वाघमारे, वामन वाघमारे, माजी सरपंच तेजस्विनी वाघमारे, माजी उपसरपंच विजय वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य प्रीतम वाघमारे, दिनेश वाघमारे, दीपक वाघमारे, संदीप वाघमारे, वासुदेव वाघमारे यांच्यासह भाजप महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, विचुंबे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी मल्हार टीव्हीशी संवाद साधताना सांगितले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या दोन्ही उमेदवारांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विकासाचे ठोस व्हिजन घेऊन आम्ही जनतेपर्यंत पोहोचत आहोत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून झालेला विकास आम्ही लोकांपर्यंत पोहोचवत आहोत. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले अनेक प्रकल्प आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयतकांमुळे मार्गी लागले असून, याच विकासाच्या जोरावर मतदार भाजप महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



## सलग सुट्ट्यांमुळे घाटात वाहनांच्या रांगा; पर्यटकांचे हाल



**नेरळ : प्रतिनिधी**

सलग आलेल्या शनिवार–रविवारच्या सुट्ट्या आणि २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटकांचा अक्षरशः लोंढा उसळला असून, यामुळे माथेरान घाटात आणि परिसरात तीव्र वाहतूक कोंडीचे चित्र पाहायला मिळाले.

माथेरान दस्तुरी नाका येथील वाहनतळ पूर्णपणे भरल्याने घाटात प्रवेश करणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दस्तुरी नाका ते गारबट पॉईंटदरम्यान सुमारे दीड किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. सकाळच्या सुमारास सुरू झालेली ही कोंडी दुपारी १ वाजून गेल्यानंतरही सुटली नव्हती, त्यामुळे पर्यटकांना तासनतास घाटात अडकून राहावे लागले.

कोंडीमुळे अनेक पर्यटकांनी आपली वाहने रस्त्याच्या कडेला पार्क करून लहान मुलांना कडेवर घेत, सामानासह पायीच घाट चढून माथेरान गाठण्याचा निर्णय घेतला. माथेरान शहरात जाण्यासाठी काही ठिकाणी ई–रिक्षांसाठी प्रचंड गर्दी झाल्याचेही चित्र दिसून आले. नेरळहून माथेरानकडे जाणाऱ्या वाहतूक टॅक्सी सेवा देखील अर्ध्यावरच थांबत असल्याने पर्यटकांना शेवटी पायी चालतच प्रवास पूर्ण करावा लागला.

सुट्यांचा लाभ घेत पाच हजारांहून अधिक पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाल्याची प्राथमिक माहिती असून, थंड हवा आणि निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी ही गर्दी झाली आहे, मात्र या गर्दीचा फटका पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनाही बसला आहे.

दरम्यान, माथेरान घाट रस्ताच नव्हे तर नेरळ आणि कर्जत राज्य मार्गावरही वाहन कोंडी झाल्याचे चित्र शनिवारी आणि रविवारी दिसून आले. कर्जतच्या चार फाटा येथे तर नेरळ पोलीस ठाणे या दरम्यान वाहतूक कोंडी झाली होती. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उद्या २६ जानेवारी रोजीही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

या सततच्या वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असून, पोलीस प्रशासनाने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करून वाहतूक सुरळीत करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. अन्यथा सुट्यांचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांचा प्रवास हा 'निसर्ग अनुभव' न राहता घामट्याचा आणि हालअपेष्टांचा प्रवास ठरत असल्याचे चित्र सध्या माथेरान परिसरात दिसून येत आहे.

**पान १ वरुन**

## पनवेल महापालिकेतील महायुतीच्या गटनेतेपदी नितीन पाटील यांची निवड

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन असे एकूण ५९ उमेदवार विजयी झाले आहेत. जनतेने महायुतीवर दाखवलेल्या विश्वासामुळे विकासाभिमुख आणि स्थिर प्रशासनासाठी पुन्हा एकदा भाजप महायुतीला कौल मिळाल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. महायुतीच्या गटनेतेपदी नितीन पाटील यांची निवड झाल्यानंतर बुधवार, २८ जानेवारी रोजी कोकण आयुक्त कार्यालयात महायुतीची अधिकृत गट नोंदणी करण्यात येणार आहे. त्यानंतर महापौर व उपमहापौर पदांसाठी १० फेब्रुवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती कटिबद्ध असून नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरेल असे काम पुढील काळात करण्यात येईल, असा विश्वास या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. तर गटनेता म्हणून दिलेली जबाबदारी सर्वांच्या सहकार्याने आणि विश्वासाने पार पाडू, असा विश्वास नितीन पाटील यांनी व्यक्त केला.

## आकुर्ली मालेवाडी येथे लाडक्या बहिणींचा मेळावा

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यानंतर महिलांसाठी विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. भारतीय जनता पार्टी ही निवडणुकीपुरती काम करणारी नाही, तर वर्षभर जनतेच्या सेवेत कार्यरत असते. राज्यात महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजना सुरू करून महिलांना मोठा दिलासा दिला आहे. हे सरकार काम करणारे सरकार असून आपण मोदी सरकार आणि फडणवीस सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, पनवेल मतदारसंघातील असे एकही गाव शिल्लक नाही जिथेआम्ही विकासाची कामे पोहोचलेली नाहीत. याउलट विरोधकांनी कर्नाळा बँकेत घोटाळा करून गरिबांचे पैसे लुबाडले आणि ते स्वतःच्या घरात नेण्याचा विचार केला. भाजपचा कार्यकर्ता तुमच्यात राहून तुमच्या अडीअडचणी दूर करण्याचे काम करतो. केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी भूपेंद्र पाटील नेहमीच अग्रेसर राहिले आहेत.

पंचायत समितीच्या निवडणुकीत भूपेंद्र पाटील आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आत्माराम भस्मा यांना निवडून देण्याचे, तसेच त्यांना आपले आशीर्वाद देण्याचे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले. मेळाव्यामुळे परिसरात महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या वेळी महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन ही करण्यात आले होते.

# केळवणे गावात भाजपची जोरदार पदयात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केळवणे गावात रविवारी (दि.२५) भाजपची जोरदार प्रचार रॅली करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात भारतीय जनता पक्षाने प्रचाराचा वेग वाढवला असून, केळवणे जिल्हा परिषद गट क्रमांक ८ मधून मंगेश रामचंद्र वाकडीकर, केळवणे पंचायत समिती गण क्रमांक १५ मधून शितल अनंत माळी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर भाजपचा प्रचार अधिक झाला आहे.



या वेळी बोलताना केळवणे पंचायत समिती उमेदवार शितल अनंत माळी यांनी सांगितले की, पंचक्रोशीतील गावांमध्ये रस्ते, वीज, पाणी, गटारे, स्मशानभूमी यांची प्रलंबित कामे मार्गी लावणार, महिला बचत गटांच्या माध्यमातून विविध प्रकारचे लघु उद्योग सुरू करून त्यांना स्वावलंबी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून मी नक्की करेन हा आत्मविश्वास मला आहे हे सर्व प्रत्यक्षात उतरविण्यासाठी एक संधी जागृत मतदारांनी मला द्यावी, असे आवाहन मी या निमित्ताने सर्व मतदारांना करीत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, माजी नगराध्यक्ष जे.एम म्हात्रे साहेब, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, विरोधी पक्ष नेते प्रितमजी म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वरजी घरत यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यानंतर हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रचाराला सुरुवात झाली असून, प्रत्येक मतदारसंघात प्रचार रॅल्या आणि घरोघरी भेटी घेत मतदारांशी थेट संवाद साधण्यात येत आहे. दिवसभरात केळवणे गावात येथील आदिवासी वाड्या उमेदवारांनी घरोघरी जाऊन भेटी दिल्या. प्रत्येक घरात जाऊन मतदारांशी संवाद साधत, आतापर्यंत करण्यात आलेल्या विकासकामांची माहिती देण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ नागरिक, महिला व युवकांनी उमेदवारांना भरभरून आशीर्वाद दिले. कमळ या भाजपच्या निवडणूक चिन्हाच्या घोषणांनी संपूर्ण परिसरात केला.

या वेळी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, पंचायत समितीचे माजी उपसभापती जिवन म्हात्रे, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष विद्याधर जोशी, भाजप नेते हिरामण ठाकूर, केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष सुशिल ठाकूर, सुरेश बारका पाटील, भानुदास गावंड, गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, केळवणे ग्रामपंचायत सदस्या उज्वला ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, सदस्या शितल पाटील, अनंत माळी, नंदू गावंड, रविंद्र माळी, तेजस माळी, राजेश घरत, शर्मिला माळी, योगेश घरत, दर्शन मोकल, भारत ठाकूर आदी उपस्थित होते.

# विकासकामांच्या जोरावर हर्षदा घरत, योगिता लहाने यांची प्रभावी प्रचार रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने २४ जानेवारी रोजी वारदोली ग्रामपंचायत हद्दीतील बेलवली, वारदोली व ठाकूरवाडी परिसरात प्रचार रॅलीचे सुनियोजित आयोजन करण्यात आले. या रॅलीतून भाजपाने भव्य शक्तीप्रदर्शन करत मतदारांमध्ये विकासाचा विश्वास दृढ केला.



पळस्पे जिल्हा परिषद गटाच्या अधिकृत उमेदवार हर्षदा अतुल घरत तसेच कोन पंचायत समिती गणाच्या अधिकृत उमेदवार योगिता योगेश लहाने यांच्या प्रचारासाठी आयोजित या रॅलीत भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या तसेच ग्रामस्थ सहभागी झाले होते.

वारदोली ग्रामपंचायत हद्दीत आमदार निधीतून झालेली असंख्य विकासकामे हीच या प्रचाराची प्रमुख ओळख ठरली. आम्ही बोलून नाही, करून दाखवतो ही भाजपची कार्यपद्धती प्रत्यक्ष कामांतून दिसून येत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. बेलवली–वारदोली–ठाकूरवाडी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, बेलवली येथील नवीन गणपती घाट, वारदोली येथील अंगणवाडी दुरुस्ती, स्मशानभूमी संरक्षक भिंत तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कलावंतीन दुर्गाकडे जाणाऱ्या खडतर पायवाटीचे सुसज्ज रस्त्यात रूपांतर ही कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

याशिवाय येत्या काळात रायगड जिल्हा परिषद शाळा बेलवलीची दुरुस्ती तसेच ग्रामपंचायतचे नवीन कार्यालय उभारण्याचे काम लवकरच सुरू होणार असून, ही सर्व कामे आमदार निधीतून मंजूर झालेली आहेत. त्यामुळे या भागात भाजपाला मोठे जनसमर्थन लाभत असल्याचे चित्र या प्रचार रॅलीतून स्पष्ट झाले.

## निवडक

### मंगळसूत्र खेचून चोर पसार

**पनवेल :** भंगारपाडा येथे राहणाऱ्या एका महिलेचे मंगळसूत्र खेचून एक जण पसार झाल्याची घटना घडली. मंजुळा दमडे (वय ५५) या पारगाव येथून चालत घरी जाताना, पाठीमागून आलेल्या एका लुटारूने त्यांना जोरात धक्का दिला.धक्क्यामुळे मंजुळा खाली पडल्यानंतर, त्याने मंजुळा यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. या घटनेत मंजुळा खाली पडल्याने त्यांच्या हाताला व मंगळसूत्र खेचताना मानेला दुखापत झाली. याप्रकरणी त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून अधिक तपास सरू आहे.

### मान्यताप्राप्त शिक्षणक्रमांचे प्रवेश सुरू

**पनवेल :** पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण क्रमांचे जानेवारी २०२६ सत्राचे चे प्रवेश सुरू झाले आहेत. पदवी शिक्षणक्रमांमध्ये बीबीए अकौंटिंग अँड फायनान्शिअल मॅनेजमेंट, बीबीए इव्हेंट मॅनेजमेंट, बीसीए, बीकॉम, बीए तर पदव्युत्तर शिक्षणक्रमांमध्ये एमबीए, एमकॉम, एमए ह्यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी यशवंत मेमोरियल ट्रस्ट अशोका गार्डन्स धूतपापेश्वर आयुर्वेदिक कारखान्याच्या बाजूला ९८१९२४८७७१ / ९८१९५४०४४८ येथे संपर्क साधावा.

# उरण पोलिसांची मुस्कान मोहीम



**उरण : बातमीदार**

उरण पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सचिन पाटील यांनी ऑपरेशन मुस्कान मोहिमेंतर्गत उरण बाजारपेठेत भरकटलेल्या महिला आणि मुलाला वाचवले. आशिया परवीन कलाम हुसेन (वय ३२) आणि त्यांचा मुलगा फैजान कलाम हुसेन (वय १०) हे झारखंडच्या गिरीडी जिल्ह्यातील निवासी असून, कौटुंबिक वादातून घर सोडून बंगलोर जाण्यासाठी चुकीची ट्रेन पकडून उरण येथे आले होते.

पोलिसांनी सखोल चौकशी करून आशियाच्या पती कलाम हुसेन यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर आशियाचा भाऊ गया सुदिन आयूब अली अन्सारी उरण पोलीस स्टेशन येथे हजर झाला आणि त्यांना व सदर मिसिंग महिला व मुलगा यांना पोलीस निरीक्षक राहुल कटवानि (गुन्हे) यांचे समक्ष हजर करून त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

या प्रकरणात पोलीस हवालदार सचिन पाटील यांनी आशिया आणि त्यांच्या मुलाला सुरक्षित त्यांच्या परिवाराच्या ताब्यात दिले. या कार्यवाहीसाठी पोलीस निरीक्षक राहुल कटवानि (गुन्हे) यांनी पोलीस हवालदार सचिन पाटील यांना शाबासकी दिली आहे. पोलीस हवालदार सचिन पाटील यांनी या अगोदरही अनेक हरविलेल्या व्यक्तींची घर वापसी केलेली आहे. अनेकांना योग्य मार्गदर्शन करून भरकटलेल्यांना योग्य मार्ग दाखविला आहे. सचिन पाटील यांनी केलेल्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांचा सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन तसेच ''घर घर संविधान' या अभियानांतर्गत 'सैनिक हो तुमच्यासाठी देशप्रेमाचा स्वरसोहळा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार आहे.

भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने देवकी मीडिया यांच्या प्रस्तुतिकरणाखाली या भव्य देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या देशभक्तीपर कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदक विनीत देव सूत्रसंचालन




करणार असून, सुप्रसिद्ध गायक–गायिका रुपाली वराडकर, सतीश भानुशाली, कोमल तेंडुलकर आणि संतोष पाटील हे कलाकार देशभक्तीपर गीतांच्या सादरीकरणातून प्रेक्षकांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागवणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून पूर्णतः विनामूल्य आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या देशभक्तीपर स्वरसोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# खारघर वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी संजय जोशी



**पनवेल :** खारघर पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी संजय जोशी यांची नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे . यापूर्वी पनवेल शहर पोलीस ठाणे व उरण पोलीस ठाणे येथे दमदार कामगिरी करणारे संजय जोशी यांची खारघर पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी नियुक्ती करण्यात आली आहे . तर खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि अजय कांबळे यांची नेरुळ पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

# ट्रक उलटून अपघातात चार वाहनांचे नुकसान




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील सांगुर्ली गावाजवळ रविवारी सकाळी एक ट्रक उलटा होऊन तो रस्त्यावर घरंगल्याने झालेल्या अपघातात चार वाहनांचे नुकसान झाले असून एक जण जखमी झाला आहे .

रविवारी सकाळी पळस्पे– पेण महामार्गावरून मालाने भरलेला ट्रक जात असताना अचानक पणे रस्त्यावर पलटी होऊन तो मागे सरकत आल्याने सदर ट्रकच्या मागे येणारा टेम्पो, चार चाकी वाहन, शाळेची व्हॅन व मोटार सायकल याना धडकल्याने झालेल्या अपघातात या चारही वाहनाचे मोठे नुकसान झाले.

यामध्ये एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कारमेलच्या विद्यार्थ्यांकडून वाहतूक सुरक्षा आणि नियमांसाठी अनोखा संदेश

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक सुरक्षा पोलीस दलातर्फे १ ते ३० जानेवारी हा महिना, 'रस्ता सुरक्षा मास' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कळंबोली वाहतूक पोलिसांनी आणि कार्मेल कॉन्व्हेन्ट हायस्कूल कळंबोली यांच्या विद्यमाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाच्या प्रांगणात रस्ता सुरक्षा आणि नियम यावर आधारित चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन जणू वाहतूक पोलिसांना या उद्देशासाठी आम्ही ही तुमच्या सोबत आहोत हा संदेशच दिला. पुन्हा एकदा विद्यालयाची चिमुकली



पावले सरसावली आणि पूर्ण कळंबोलीमधून प्रभातफेरी काढून सर्व जनतेला वाहतुकीचे नियम आणि सुरक्षा किती महत्वाची आहे, याचे महत्व पटवून दिले. या विद्यार्थ्यांसोबत वाहतूक पोलीस दलातील पोलिस, शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या घोष वाक्यानी कळंबोली परिसर दणाणून गेला. वाहतूक सुरक्षेसाठी कार्मेल कॉन्व्हेन्ट हायस्कूलच्या या विद्यार्थ्यांचा पुढाकार आणि उत्साह पाहून परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

या वेळी कळंबोली वाहतूक सुरक्षा दलाचे पी.एस.आय. हणमंत गलांडे, ए. एस.आय. रवींद्र कोकणे, पोलीस हवालदार राजेंद्र भांडारकर, पोलीस नाईक प्रशांत ठाकूर हे हजर होते. सर्वांनी विद्यार्थ्यांचे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सुष्मिता यांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे आभार ही मानले.

# भाजपकडून उपसरपंच अशोक गायकर यांचे निलंबन निर्णय मागे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भिंगार ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक गायकर यांच्याविरोधात पक्षविरोधी कारवाई केल्याच्या तक्रारीवरून भारतीय जनता पक्षाने घेतलेला निलंबनाचा निर्णय अखेर मागे घेण्यात आला आहे. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी याबाबत अधिकृत पत्राद्वारे माहिती दिली आहे.

काही महिन्यांपूर्वी स्थानिक कार्यकर्त्यांकडून गायकर यांनी पदाच्या विरोधात सातत्याने कारवाई केल्याच्या तक्रारी पक्षाकडे दाखल झाल्या होत्या. त्यानंतर पक्षाच्या मंडल अध्यक्षांकडून निलंबनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र या प्रकरणी संबंधित विभागीय अध्यक्ष अनेश गणु ढवळे तसेच इतर स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सखोल चर्चा करून चौकशी केली. या चौकशीत गायकर यांनी पदविरोधी कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे स्पष्ट झाल्याची माहिती पक्षाला मिळाली.

या पार्श्वभूमीवर पक्षाने निलंबनाचा निर्णय मागे घेतला असून, आगामी काळात तसेच येणाऱ्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षासाठी सक्रियपणे व निष्ठेने कार्य करावे, अशी अपेक्षा पक्षाने व्यक्त केली आहे. या निर्णयामुळे भिंगार ग्रामपंचायत परिसरात राजकीय चर्चांना वेग आला असून, भाजप संघटनात्मक एकजुटीचा संदेश देण्यात आला असल्याचे मानले जात आहे.

# पळस्पे गावात लाडक्या बहिणींचा मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील पळस्पे गावात राधे हेरिटेज महिला मंडळ यांच्या वतीने लाडक्या बहिणींचा मेळावा शनिवारी मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला पळस्पे जिल्हा परिषद मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्ष महायुतीच्या उमेदवार हर्षदा घरत तसेच पळस्पे पंचायत समितीचे उमेदवार राजेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.





या वेळी उपस्थित महिलांना संबोधित करताना राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, राज्यातील महायुतीचे सरकार लाडक्या बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून, त्याच विकासाच्या जोरावर आपण ही निवडणूक लढवत आहोत. या विकासकामांना साथ देण्यासाठी आणि दोन्ही उमेदवारांना आशीर्वाद देण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

या मेळाव्याला भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत भोईर, भाजपचे नेते अनिष ढवळे, सपना वारके, संगीता केळकर, भाजप युवा नेते अतुल घरत, अजय तेजे, सक्हेल तांडेल, सुनील गवंडी, सुचिता काळे, राजन वारेक, सचिन देशमुख, चैताली म्हात्रे, संगीता चव्हाण, वर्षा पाटील, सुप्रिया तेजे, शिल्पा गवंडी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मेळाव्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# 'सीकेटी'च्या आनंद कुलकर्णी यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'१६वा राष्ट्रीय मतदार दिन' कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग येथे आयोजित (२५ जानेवारी) समारंभात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षक आनंद बळवंत कुलकर्णी यांना निवडणूक कार्यातील मतदार यादीचे अद्ययावतीकरण, तक्रारीचे निवारण, राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम अशा उत्कृष्ट निवडणूक कार्याबद्दल जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते ' उत्कृष्ट मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.



प्रमाणपत्र देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी नितीन वाघमारे उपजिल्हा निवडणूक अधिकारी, विक्रम पाटील तहसीलदार अलिबाग तथा डॉ.सोनाली पाटील प्रिन्सिपल जे एस एम कॉलेज अलिबाग हे सन्माननीय मान्यवर उपस्थित होते.

आनंद कुलकर्णी यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत , सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवीन चेतक २५ ईव्ही स्कूटरचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील ठाणा नाका जवळील सीजी चेतक मोटर्स या ठिकाणी अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या हस्ते नवीन चेतक सी २५, २५०१ ईव्ही स्कुटरचे उद्घाटन २४ जानेवारी रोजी करण्यात आले. या वेळी मोहिनी विक्रांत पाटील, नगरसेविका स्नेहल ढमाले–पाटील, मालक दिनेश खंडागळे, कंपनीचे सुभाषिश दास यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

चेतक सी २५, २५०१ ईव्ही ही स्कुटर नव्याने लॉन्च झाली असून यात वेगवेगळे फीचर्स देण्यात आले आहेत. तसेच ही स्कुटर वेगवेगळ्या रंगात उपलब्ध असून याची किंमतदेखील कमी आहे. चार्जिंग केल्यानंतर ११३ किमीचा मायलेज आहे. पनवेलमध्ये स्कूटरचे मॉडर्न सर्व्हिस सेंटर असून सुरुवातीच्या ग्राहकांना स्कुटरच्या किमतीत चार हजार रुपयांची सूट देण्यात आली आहे.



## संपादकीय

# प्रजासत्ताक दिन चिरायू होवो!

भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन आज संपूर्ण देशात उत्साह आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा होत आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारले आणि खऱ्या अर्थाने सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही प्रजासत्ताक म्हणून वाटचाल सुरू केली. गेल्या सात दशकांहून अधिक काळात भारताने अनेक चढउतार अनुभवले, मात्र प्रत्येक संकटातून अधिक बळकट होत देशाने प्रगतीचा नवा अध्याय लिहिला आहे.

**भारताने अनेक क्षेत्रांत भरीव प्रगती केली आहे. स्वातंत्र्यानंतरचा दारिद्र्य, अन्नटंचाई आणि निरक्षरतेचा काळ मागे टाकत देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ संशोधन आणि डिजिटल क्रांतीत मोठी झेप घेतली. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताने आपली ओळख मजबूत केली आहे. म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा केवळ परेड, झेंडे आणि भाषणांचा दिवस नाही, तर संविधानाने दिलेल्या मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय या चार स्तंभांवर भारतीय लोकशाही उभी आहे. विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे, ही बाबच आपल्या प्रजासत्ताक व्यवस्थेची ताकद दर्शवते. गेल्या ७७ वर्षांत भारताने शेती, उद्योग, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ संशोधन, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत लक्षणीय प्रगती केली आहे. हरितक्रांतीमुळे अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भरता साधली. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केली. चंद्रयान, मंगलयानसारख्या मोहिमांनी अंतराळ क्षेत्रात भारताची क्षमता सिद्ध केली. संरक्षण क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर वाढत असून 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. लोकशाही व्यवस्थेची खरी कसोटी ही केवळ विकासात नसून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि कर्तव्यांची जाणीव यात आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क दिले असले तरी त्यासोबत मूलभूत कर्तव्येही दिली आहेत. आजच्या बदलत्या काळात संविधानिक मूल्यांची जपणूक करणे ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सामाजिक सलोखा, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवणे हेच प्रजासत्ताक दिनाचे खरे औचित्य आहे. आज भारत जागतिक पातळीवर महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचा प्रभाव वाढत आहे. 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वावर आधारित भारतीय दृष्टिकोनाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देशाची विश्वासार्हता वाढवली आहे. विकासाच्या या वाटचालीत सामाजिक विषमता, पर्यावरणीय प्रश्न, लोकशाही मूल्यांपुढील आव्हाने याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. संविधानाची केवळ पूजा न करता त्यातील मूल्ये आचरणात आणणे आवश्यक आहे. लोकशाही मजबूत ठेवण्यासाठी जागरूक नागरिक घडणे, संवाद साधणे आणि जबाबदारीने मतदान करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा प्रजासत्ताक दिन आपल्याला केवळ भूतकाळातील गौरवाची आठवण करून देत नाही, तर भविष्यासाठी दिशा दाखवतो. न्याय्य, समतावादी, प्रगत आणि सशक्त भारत घडवण्याची प्रेरणा देतो. त्यामुळेच आपण ठामपणे म्हणू शकतो संविधानाची ज्योत सदैव प्रज्वलित राहो, लोकशाहीची मुळे अधिक खोलवर रूजोत आणि हा दिवस चिरायू होवो!**


# संविधान, स्वातंत्र्य आणि जबाबदारीचा उत्सव प्रजासत्ताक दिन


बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो, हे स्वप्न उराशी बाळगून कोट्यवधी भारतीयांच्या अस्मितेचा सोहळा म्हणजे 'प्रजासत्ताक दिन'. प्रजासत्ताक दिवस हा दिवस प्रत्येक भारतीयांसाठी फार महत्वाचा आहे. भारत यावर्षी २६ जानेवारी रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन अभिमानाने आणि उत्साहाने साजरा करत आहे. भारताचा प्रजासत्ताक दिन दरवर्षी २६ जानेवारी रोजी साजरा केला जातो. या दिवसाला देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा दिवस अभिमान आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, मात्र त्या वेळी देशाकडे स्वतःचे संपूर्ण संविधान नव्हते. पुढील काही वर्षे भारताने ब्रिटिश काळातील कायद्यांवरच कारभार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेने अथक परिश्रमातून भारतीय संविधान तयार केले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० पासून ते देशभर लागू झाले. याच दिवसाच्या स्मरणार्थ २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून निवडण्यात आला.

**भारतीय संविधानाचे वैशिष्ट्य**

भारतीय संविधान हे जगातील सर्वात विस्तृत आणि सविस्तर लिखित संविधान मानले जाते. या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचे अधिकार दिले. धर्म, जात, भाषा, लिंग किंवा प्रदेश यावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान हक्क मिळावेत, हा संविधानाचा मुख्य उद्देश आहे. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांच्या माध्यमातून संविधान नागरिक आणि राज्य यांच्यातील नाते अधिक मजबूत करते.

भारत हे एक मोठे लोकशाही राज्य आहे. म्हणजे हे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य आहे. हा अधिकार भारताच्या घटनेनुसार २६ जानेवारी १९५० साली मिळाला. त्या दिवसापासून प्रजेची सत्ता सुरू झाली. हा दिवस भारतात सर्वत्र साजरा केला जातो. भारताच्या राजधानीत या दिवशी सकाळी ध्वजारोहणानंतर लालकिल्ल्यावरून पंतप्रधानांचे राष्ट्राला उद्देशून भाषण होते. या समारंभाचा मुख्य कार्यक्रम भारताची राजधानी दिल्ली येथे होतो. या कार्यक्रमात भारताती सर्व घटकराज्ये भाग घेतात. भारताच्या सर्व क्षेत्रातील वैभवाचे दर्शन घडविणारी भली मोठी





मिरवणूक काढतात. प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात, शहरात आणि गावागावातून प्रजासत्ताक दिन साजरा होतो. शाळांतून, सरकारी कार्यालयातून व अन्यत्रही सकाळी ध्वजवंदन व अन्य मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. ठिकठिकाणी प्रभातफेऱ्या भाषणे, प्रदर्शन यांचे आयोजन केले जाते. धाडसी मुलांचा आणि विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्यांचा या दिवशी सरकारतर्फे गौरव केला जातो. अनेक ठिकाणी रात्री रोषणाई केली जाते. प्राथमिक शाळांतून मुलांना खाऊ वाटला जातो.

शाळांना तोरणे-पताका, आपले तिरंगी ध्वज लावली जातात. लहान मोठी मुले तिरंगी ध्वज मोठ्या उत्साहाने हातात घेऊन भारत मातेचा जयघोष करीत प्रभात फेरीत भाग घेतात. सर्व विद्यार्थी अध्यापक, मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण केले जाते. शाळेतील, एनसीसी व स्काउटचे विद्यार्थी सुंदर संचलन करतात. शाळेतील वाद्यवृंदावरही राष्ट्रीय गाणी वाजविली जातात मुख्याध्यापकांकडून गुणी विद्यार्थ्यांचे कौतुक होते व त्यांना सन्मानपत्रे दिली जातात.

प्रजासत्ताक दिनाचे मुख्य आकर्षण म्हणजे राजधानी दिल्लीतील राजपथावर होणारी भव्य परेड. राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात येतो आणि तिन्ही सैन्य दलांची ताकद, शिस्त आणि शौर्य या परेडमधून सादर होते. विविध राज्यांची सांस्कृतिक झलक दाखवणाऱ्या चित्ररथांमुळे भारताची विविधतेतील एकता अधोरेखित होते. देशभरातील शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहण, देशभक्तीपर कार्यक्रम आणि भाषणे आयोजित केली जातात.

लोकशाहीतील नागरिकांची भूमिका

प्रजासत्ताक दिन आपल्याला केवळ अधिकारांची आठवण करून देत नाही, तर आपल्या कर्तव्यांची जाणीवही करून देतो. मतदानाचा हक्क वापरणे, कायद्याचे पालन करणे, राष्ट्रीय एकात्मता जपणे आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशील राहणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लोकशाही मजबूत राहण्यासाठी जागरूक, सुजाण आणि जबाबदार नागरिक असणे अत्यंत आवश्यक आहे.

**भारताचे भवितव्य युवकांच्या हातात**

भारताचे भवितव्य युवकांच्या हातात आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने युवकांनी संविधानाची मूल्ये आत्मसात करणे, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेणे गरजेचे आहे. भ्रष्टाचारमुक्त, समताधिष्ठित आणि प्रगत भारत उभारण्यासाठी युवकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे या दिवशी संपूर्ण देशभर आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून येते, पण निव्वळ उत्साहात दिवस साजरा केल्याने आपली जबाबदारी संपत नाही. खरेतर हा प्रतिज्ञेचा दिवस! लोकशाहीच्या उदघोषाचा दिवस! प्रत्येक भारतीयाने या त्त्वाच्या दिवशी देशासाठी देशहितकारक कार्य करण्याची प्रतीज्ञा केलीच पाहिजे आणि त्यानुसार वागले पाहिजे. असे राष्ट्रीय दिन साजरे केल्यामुळे प्रत्येकाच्या मनातील राष्ट्रीय भावना राष्ट्रप्रेम अधिक उसळून, उजळून निघते.

भारत २०२६ च्या प्रजासत्ताक दिनाच्या तयारीत असताना , संरक्षण मंत्रालय MyGov च्या भागीदारीत देशभरातील नागरिकांना राष्ट्रीय ऑनलाइन स्पर्धा आणि उपक्रमांच्या उत्साही मालिकेत सहभागी होण्यासाठी अभिमानाने आमंत्रित करत आहे. हे उपक्रम कुतूहल जागृत करण्यासाठी, सर्जनशीलतेला प्रेरणा देण्यासाठी आणि भारताच्या कालातीत वारशाबद्दल आणि उल्लेखनीय प्रवासाबद्दल आपली सामूहिक प्रशंसा वाढविण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

प्रजासत्ताक दिन हा केवळ एक राष्ट्रीय उत्सव नाही - तो आपल्या संविधानाच्या अंमलबजावणीच्या दिवसाला श्रद्धांजली आहे, ज्याने भारताला जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीमध्ये रूपांतरित केले. आपल्या आदर्शांचा सन्मान करण्याचा आणि आपण एकत्र करत असलेल्या प्रगतीचा उत्सव साजरा करण्याचा हा क्षण आहे.

या आकर्षक स्पर्धांद्वारे, आम्ही नागरिकांना - विशेषतः विद्यार्थी, तरुण आणि सर्जनशील मनांना - त्यांची देशभक्ती व्यक्त करण्याचे, त्यांच्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्याचे आणि मजबूत, एकसंध आणि प्रगतीशील भारतासाठी त्यांचे दृष्टिकोन सामायिक करण्याचे आवाहन करतो.

२६ जानेवारी हा केवळ एक दिवस नाही, तो आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. या दिवशी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारून स्वातंत्र्याला दिशा दिली. आपण केवळ नागरिक नाही, तर या राष्ट्राच्या मूल्यांचे रक्षक आहोत, ही जाणीव हा दिवस करून देतो. संविधानाने दिलेले हक्क आपल्याला सन्मान देतात, तर कर्तव्ये आपल्याला जबाबदार बनवतात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही केवळ शब्द नाहीत, ती आपली जीवनपद्धती आहे. अनेक त्याग, संघर्ष आणि बलिदानातून हा भारत घडलेला आहे. आजचा दिवस त्या सर्वांना कृतज्ञतेने आठवण्याचा आहे. तिरंग्याकडे पाहताना छाती अभिमानाने भरून येते.

**प्रजासत्ताक दिनाचा संदेश**

प्रजासत्ताक दिन आपल्याला स्वातंत्र्य केवळ मिळवण्यापुरते मर्यादित नसून ते जपण्याची जबाबदारीही आपलीच आहे, हे शिकवतो. संविधानाचे पालन, लोकशाही मूल्यांचा सन्मान आणि राष्ट्रीय एकतेचे रक्षण हेच या दिवसाचे खरे सार आहे. प्रजासत्ताक दिन हा भारताच्या आत्मसन्मानाचा आणि लोकशाही बळकटीचा प्रतीक आहे. हा दिवस आपल्याला संविधानाच्या आदर्शांनुसार जगण्याची प्रेरणा देतो. सत्यमेव जयते या तत्त्वावर चालत, न्याय, समानता आणि बंधुतेची मूल्ये जोपासत पुढे जाणे, हाच प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ आहे. या पवित्र दिवशी आपण सर्वांनी मिळून एक सशक्त, समृद्ध आणि एकसंध भारत घडवण्याचा संकल्प करूया.लोकशाही टिकवणे ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपली मते, आपली कृती आणि आपले आचरण राष्ट्र घडवत असते. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान



# नेटवर्क संबंधित समस्या स्टारलिंकने होणार दूर

उद्योगपती इलॉन मस्क यांची कंपनी स्टारलिंकने ही भारतात आपला व्यवसाय सुरू केला आहे. स्टारलिंकला भारतात सॅटेलाइट इंटरनेट सेवा देण्यासाठी लवकरच भारत सरकारकडून मंजूरी मिळणार आहे. या सेवांच्या मदतीने भारतातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांची नेटवर्कशी संबंधित समस्या दूर होईल. स्टारलिंकने डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री ॲण्ड इंटर्नल ट्रेडला शेअर होल्डिंग पॅटर्न स्पष्ट केल्यावरच कंपनीला मान्यता दिली जाईल. यानंतर दूरसंचार विभाग स्टारलिंकला लेटर ऑफ इंटेंट जारी करेल.




विभाग एक नोट तयार करत आहे, जी दूरसंचार सचिव नीरज मित्तल आणि दळणवळण मंत्री अश्वनी वैष्णव यांना मंजुरीसाठी दिली जाईल. एकदा त्यांची संमती मिळाल्यावर सॅटेलाइट कम्युनिकेशन विंग स्टारलिंकला मान्यता देईल. २०२२मध्ये स्टारलिंकने सॅटेलाइट सर्व्हिसेसद्वारे ग्लोबल मोबाइल पर्सनल कम्युनिकेशच्या लायसेन्ससाठी अर्ज केला आहे. जिओ सॅटेलाइट कम्युनिकेशन आणि वनवेब नंतर हा परवाना मिळवणारी स्टारलिंक ही तिसरी कंपनी ठरली आहे.

सॅटेलाईट आधारित ब्रॉडबँड सेवांसाठी DoT सध्या स्टारलिंकला संमती देणार नाही. यानंतर स्टारलिंकला अर्थ स्टेशन उभारण्यासाठी भारतीय राष्ट्रीय अवकाश संवर्धन आणि प्राधिकरण केंद्राकडून मंजुरी घ्यावी लागेल. स्टारलिंकला एवढ्या मंजूरी मिळाल्या तरीही दूरसंचार विभागाकडून स्पेक्ट्रमची वाट पाहावी लागेल. Amazon Mo satcom arm-Project Kuiperदेखील भारतात GMPCS परवाना मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सॅटेलाइट कम्युनिकेशन्स किंवा सॅटकॉम ४जीच्या बरोबरीने स्पीड देतात. ही स्पीड १०० मेगाबिट्स प्रति सेकंदपर्यंत आहे, परंतु ५जीप्रमामे १० गीगाबिट्स प्रति सेकंदपर्यंत नाही. स्टारलिंक युजर्सना २५ ते २२० Mbpsदरम्यान डाउनलोड स्पीड मिळेल. कंपनीच्या वेबसाइटनुसार अपलोड स्पीड ५ ते २० एमबीपीएस दरम्यान असेल. हे तंत्रज्ञान दुर्गम भागातील ग्राहकांसाठी फायदेशीर आहे. रिपोर्ट्सनुसार या हाय स्पीड सेवेसाठी भारतीय ग्राहकांना दरमहा ७,४२५ रुपये मोजावे लागू शकतात.

# व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण

रासीपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण म्हणजेच आर. के. लक्ष्मण यांनी द टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रातून काढलेली व्यंगचित्रे खूप गाजली होती. 'कॉमन मॅन' या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून त्यांनी भोवतालच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक घडामोडींवर मार्मिक भाष्य केले होते.

आर. के. लक्ष्मण यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९२४ म्हैसूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना व्यंगचित्रांची आवड होती. लक्ष्मण यांनी बीएची पदवी संपादन. त्यानंतर 'फ्री प्रेस जनर्ल्स'मध्ये पूर्णवेळ पहिली नोकरी केली. येथेच बाळासाहेब ठाकरे यांची त्यांच्याशी मैत्री झाली. फ्री प्रेसची नोकरी सोडल्यानंतर त्यांनी अर्धशतकभर 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये व्यंगचित्रे रेखाटली. त्यांचे 'कॉमन मॅन' हे व्यंगचित्र बरेच गाजले. या व्यंगचित्रामुळेच व्यंगचित्रकार म्हणून त्यांची देशभर ओळख निर्माण झाली. लक्ष्मण यांचा कॉमन मॅन सगळ्यांना इतका आवडतो की कॉमन मॅन पुतळाचा एक पूर्णाकृती पुतळाही पुण्यात सिंबायोसिस कॉलेजमध्ये बनविण्यात आला आहे. त्यांच्या निवडक व्यंगचित्रांची पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत.

लक्ष्मण यांनी एशियन पेन्ट्ससाठी काढलेले गट्टूचे चित्रही लोकप्रिय आहे. त्यांनी लिहिलेली प्रवासवर्णने तसेच 'मालगुडी डेज' या



**निमित्त**

कादंबरीसाठी रेखाटलेली अर्कचित्रे लोकप्रिय झाली होती. भारतीय व्यंगचित्रकलेला त्यांनी नवी ओळख मिळवून दिली. प्रारंभीच्या काळात त्यांनी हिटलर, मुसोनिली, नेहरू, गांधी आदी व्यक्तींची व्यंगचित्रे काढली होती.

महात्मा गांधीपासून अटलबिहारी वाजपेयी, सोनिया गांधीपर्यंत राजकीय व्यक्तींच्या अनेक पिढ्या त्यांनी रेखाटल्या आहेत. एका साध्या रेषेतून या नेत्याचे व्यक्तिवैशिष्ट्य स्पष्ट करण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती. त्यांनी काढलेल्या व्यंगचित्रांमुळे सर्वसामान्य भारतीय माणूस 'कॉमन मॅन' देशभर आणि जगभर पोहचला आहे. त्यांनी १९५०पासून 'टाइम्स ऑफ इंडिया'मधून व्यंगचित्रे काढायला सुरुवात केलेल्या या व्यंगचित्रकाराने आपल्या मिश्कील, खुमासदार तर कधी बोचऱ्या, उपरोधिक, धारधार टिप्पणीने समाजातील उणिवांवर, दोषांवर भाष्य केले.

यू सेड इट नावाने त्यांनी फक्त व्यंगचित्र असलेले 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये एक सदर सुरू केले. दैनिकाच्या मुखपृष्ठावर आजतागायत नियमितपणे प्रकाशित होत असलेले हे सदर लोकांना खूप आवडते. त्यांनी रेखाटलेल्या व्यंगचित्रांची पुस्तके म्हणजे भारतीय समाजमनाचा एक ऐतिहासिक ठेवाच आहे. फक्त व्यंगचित्रकार इतकीच त्यांची ओळख नव्हती. निबंध, प्रवासवर्णने आणि लघुकथा या प्रांतातही त्यांनी मुशाफिरी केली आहे. त्यांना देश-विदेशी पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने १९७१ साली पद्मभूषण आणि २००५ साली पद्मविभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. जर्नालिझम, लिटरेचर अँड क्रिएटिव्ह कम्युनिकेशन आर्टबद्दल त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने १९८४मध्ये गौरवण्यात आले. कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा गोदावरी गौरव पुरस्कार प्राप्त झाला होता तसेच मराठावाडा विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही सन्माननीय पदवी दिली होती. आर. के. लक्ष्मण यांनी आत्मचरित्र लिहिले आहे. त्याच पुस्तकाचे 'लक्ष्मणरेषा' नावाने मराठीत अनुवाद करण्यात आला आहे. २६ जानेवारी २०१५ रोजी त्यांचे निधन झाले.

साभार - इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरणे योग्य?

स्वयंपाकघरात तेलाचा सर्वात जास्त वापर केला जातो. यामुळे फक्त जेवणाची चव वाढत नाही, तर शरीराच्या कार्यासाठी आवश्यक असलेली पोषक तत्वही मिळतात. बिनातेलाचा स्वंयपाक चवीलाही खास लागत नाही, पण गरजेपेक्षा जास्त तेल खाणं तब्येतीसाठी नुकसानकारक ठरू शकतं. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे तेल उपलब्ध असतात. नेमकं कोणतं तेल वापरायचं हे लक्षात येत नाही.



**नारळाचे तेल**

जास्तीत जास्त घरांमध्ये नारळाच्या तेलाचे सेवन केले जाते. नारळाच्या तेलाने केस मजबूत होतात आणि चेहऱ्याचा ग्लो वाढवण्यासही मदत होते. नारळाचे तेल आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते. नारळाच्या तेलाच्या सेवनाने पचनक्रिया चांगली राहण्यासही मदत होते. प्रत्येक पदार्थ बनवण्यासाठी तुम्ही नारळाच्या तेलाचा वापर करू शकत नाही. नारळाच्या तेलात बरेच साऊथ इंडियन पदार्थ बनवले जातात. वडा, इडली, सांभर आणि भाज्यांचे सेवन करा.

**ऑलिव्ह ऑईल**

ऑलिव्ह ऑईल आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. यात हेल्दी फॅट्सस असतात. ज्यामुळे ओव्हर ऑल हेल्थ सुधारण्यास मदत होते. जेवण करण्यासाठी न वापरता इतर कामांसाठी तुम्ही ऑलिव्ह ऑईलचा वापर करू शकता. सॅलेड किंवा शॅलो फ्राय करण्यासाठी तुम्ही ऑलिव्ह ऑईलचा वापर करू शकता. या तेलातील स्वंयपाक चवीलाही चांगला लागतो.

**शेंगदाण्याचे तेल**

शेंगदाण्याचे तेल अनेक घरांमध्ये वापरले जाते. यात बरेच गुणधर्म असतात जे तब्येतीसाठी उत्तम मानले जातात. या तेलात अँटीसेप्टीक, अँटीस्पास्मोडीक गुण असतात, ज्यामुळे शरीराला बरेच फायदे मिळतात. हिवाळ्यात या तेलाचा जास्तीत जास्त वापर करा. ज्यामुळे शरीर गरम राहते आणि शरीराला उष्णता जाणवत नाही. शेंगदाण्याचे तेल अनेक प्रकारे जसं की तळण्यासाठी, भाजण्यासाठी किंवा मोहन देण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**सुर्यफुलाचे तेल**

सुर्यफुलाचे तेल आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. काही रिपोर्टनुसार सुर्यफुलाच्या तेलातील गुण पचनक्रिया चांगली ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते. इतर तेलांच्या तुलनेत हे तेल हलकं असतं. एका संशोधनानुसार सुर्यफुलाच्या तेलातील ओलिक ॲसिडमुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

# आता ई-रिक्षांची संख्या वाढली पाहिजे

## ई-रिक्षा जनसुनावणी वेळी स्थानिकांनी केली वाढीव ई-रिक्षांची मागणी

**माथेरान : बातमीदार**

माथेरान मधील हातरीक्षा चालकांना माणसाने माणसाला ओढून घेऊन जाणे या अमानवी प्रथेलातुन बाहेर काढण्यासाठी न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर एक समिती गठीत करण्यात आली.दि.६ ऑगस्ट २०२५लान्यायालयाने सहा महिन्यात हा प्रश्न मार्गी लावणे तसेचहातरीक्षा चालकांचे ई-रिक्षा द्वारे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले.

या पार्श्वभूमीवर सह नियंत्रण समितीने नेमलेल्या उपसमितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी माथेरान येथे जन सुनावणी आयोजित केली होती.यावेळी माथेरानच्या विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यांनी ई-रिक्षा ची संख्या १०० च्या आसपास असावी अशी मागणी केली.सध्या वीस ई-रिक्षांचे पायलेट प्रोजेक्ट सुरू आहे दिवसा या ई-रिक्षा विद्यार्थ्यांना सेवा देतात त्यामुळे पर्यटक व स्थानिकांना ई-रिक्षासाठी प्रतीक्षा करावी लागते.माथेरान येथे ब्रिटिश काळापासून वाहन बंदी आहे.घोडा व अमानवीय स्वरूपाच्या हात रिक्षा यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी याठिकाणी केला जातो आहे.ई-रिक्षांमुळे स्थानिक व पर्यटकांना हक्काची व स्वस्तातील अशी वाहतूक सुरू झाली असून या ई- रीक्षांची संख्या वाढणे आता अत्यंत आवश्यक झाले असल्याचे मत विविध स्थानिक संस्थांनी आणि समस्त माथेरानकरांनी व्यक्त केले.



माथेरानला २००३ मध्ये पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्यात आले. त्यानंतर येथील कामकाजआणि अन्य बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी सनियंत्रण समिती स्थापन केली गेली.सध्या या समितीचे अध्यक्ष निवृत्त सनदी अधिकारी के.पी.बक्षी असून रायगड जिल्हाधिकारी मानद सचिव आहेत.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती पण स्थापन करण्यात आली आहे.या उपसमितीमध्ये येथे नगरपरिषद,वनविभाग,पोलीस परिवहन विभाग आणि तज्ञ सदस्यांचा समावेश आहे.या उपसमितीच्या जन सुनावणी वेळी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष अनंता शेलार व चंद्रकांत जाधव यांनी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या घरापर्यंत ई-रिक्षा सेवा मिळावी अशी मागणी केली.संवेदनशील नागरिक प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी ई-रिक्षा पर्यावरण पूरक असल्यामुळे संख्येत वाढ करण्याची मागणी केली.व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी यांच्या सह उद्योजक भास्कर शिंदे यांनी देखील ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची मागणी केली.येथील व्यवसाय हा पूर्णपणे पर्यटकांवर अवलंबून असल्याने ई-रिक्षा ची सुविधा महत्वपूर्ण असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.माथेरान हॉटेल असोसिएशनचे पदाधिकारी राहुल मुनोत यांनी देखील ई-रिक्षा संख्या १०० पर्यंत वाढवावी अशी मागणी केली.ई-रिक्षा सुरू झाल्याने पर्यटकांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे,परंतु संख्या कमी असल्याने त्यांना तासन्तास वाट पहावी लागते.

### सुप्रीम कोर्टाच्या आदेशातील ठळक मुद्दे

***१) हातरिक्षा ही अमानवी प्रथा सहा महिन्यात पूर्णतः माथेरान येथे बंद करण्यात यावी, २)ई-रिक्षा चालकांना राज्य सरकारने स्वतः ई-रिक्षा खरेदी करून भाडेतत्त्वावर देण्यात याव्या यासाठी त्यांनी गुजरातच्या केवड्या येथे प्रकल्पाचे उदाहरण दिले.,३) हात रीक्षा ओढल्याने चालकांवर श्वसनाचे गंभीर आजार होतात.***

माथेरानच्या महिलांनी देखील ई-रिक्षा वाढीसाठी निवेदन दिले.सेंट झेवियर्स शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर प्रेमा यांनी सांगितले की सध्या ई-रिक्षा कमी असल्याने एका ई-रिक्षात आठ ते दहा विद्यार्थी कोंबून नेले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने ई- रीक्षांची संख्या तात्काळ वाढवावी अशी त्यांनी मागणी केली.वन ट्री हिल विभागातील रहिवाशी निवृत्त शिक्षिका कल्पना पाटील,कुमुद साळवी तसेच या विभागातील नगरसेवक किशोर मोरे यांनी वन ट्री ही विभागातील रहिवाशांना देखील ई-रिक्षा सेवा मिळावी अशी मागणी केली.श्रमिक रिक्षा संघटनेतर्फे अध्यक्ष शकील पटेल,प्रकाश सुतार,रुपेश गायकवाड,शुभम गायकवाड यांनी सर्व ९४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्याची मागणी केली.प्रकाश सुतार यांनी कोर्टाच्या आदेशाचे तात्काळ अंमलबजावणी करून उर्वरित ७४ ई-रिक्षा सुरू करण्याची मागणी केली.माथेरान प्रेस क्लब चे अध्यक्ष संजय भोसले व दिनेश सुतार यांनी देखील ई-रिक्षाची संख्या वाढवण्याची मागणी केली. सुनावणीच्या वेळी नगराध्य चंद्रकांत चौधरी, उपनगराध्य संतोष शेलार व मुख्याधिकारी राहुल इंगळे उपस्थित होते.

## 'महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम केल्यास विजय निश्चित'

**खोपोली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक उमेदवाराची नसते तर खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांची असते आणि कार्यकर्त्यांनी आपणच उमेदवार आहोत या भावनेने प्रचाराला सुरुवात केली तर आपल्याला निवडणुकीमध्ये यश मिळवायला कठीण नाही तिन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एक दिलाने एक विचाराने काम केल्यास विजय निश्चित आहे. तर प्रचार करताना अथवा सभेचेच्या वेळी कोणाविरुद्ध चुकीचे बोलायचं नाही,आपण करायचं नाही ते पाळायचं समोरच्यांनी काही चुकीचं बोललं तर त्याला आपले वरिष्ठ उत्तर देतील विनाकारण आपण कोणावर टिका टिप्पणी न करता आपल्या प्रचारात लोकांचा सहभाग कसा असेल याकडे लक्ष द्या असे अवाहन भाजपचे नेते, जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत बोलताना केले आहे. भाजप ,शिवसेना, महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या संयुक्त बैठकीत नरेश पाटील मार्गदर्शन करीत होते

आत्करगांव जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार रेश्मा पाटील, पंचायत समिती गणाचे उमेदवारांच्या प्रचारा निमित्ताने आढावा बैठक घेण्यात आली.

याप्रसंगी सेनेचे संपर्क प्रमुख विजय पाटील, भाजपचे उपजिल्हाध्यक्ष विठ्ठल मोरे, तालुका अध्यक्ष सनी यादव, सेनेच्या महिला अध्यक्षा सुप्रिया साळुंखे, विधानसभा युवा अधिकारी रोहित विचारे, शशीकांत देशमुख, वालचंद ओसवाल भाजपचे संदीप पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी माहितीच्या पदाधिकाऱ्यांनी ही कार्यकर्त्यांना संबोधित केले.




# हळदी-कुंकू कार्यक्रमातून अंधश्रद्धा निर्मूलनाचा जागर,

## विधवा व विभक्त महिलांना मानाचे स्थान

**पाली : प्रतिनिधी**

खारपाडा येथे नुकताच हळदी-कुंकू सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र हा कार्यक्रम केवळ एक धार्मिक विधी न ठरता, सामाजिक परिवर्तनाचा एक नवा वस्तुपाठ ठरला आहे. पारंपरिक चौकटी मोडीत काढत या कार्यक्रमात विधवा व विभक्त महिलांना प्रथम प्राधान्य देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच चमत्कारामागील विज्ञान उपक्रम घेतला. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदेश गायकवाड यांचे प्रबोधनात्मक सत्र. त्यांनी स्त्रिया आणि अंधश्रद्धा या विषयावर महिलांशी संवाद साधला. केवळ भाषणावर न थांबता, गायकवाड यांनी प्रत्यक्ष चमत्कार सादरीकरण प्रयोग करून दाखवले. पाण्याने दिवा पेटवणे, हवेतून वस्तू काढणे, लिंबातून रक्त काढणे, पेटता कापूर हातावर ठेवणे यांसारख्या तथाकथित चमत्कारांमागे कोणते विज्ञान दडलेले असते, हे त्यांनी प्रयोगांद्वारे सिद्ध केले. भोंदू बाबांच्या थापांना बळी न पडता महिलांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



या प्रसंगी मंचावर सामाजिक कार्यकर्त्या माधुरी घरत, मालती म्हात्रे, भीमाबाई घरत व निर्मला कृष्णा ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रमाकांत घरत यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत फुले व प्रेरणादायी पुस्तके देऊन केले. हा संपूर्ण उपक्रम रमाकांत घरत व त्यांच्या पत्नी, तसेच त्यांचे बंधू हिरामण घरत व त्यांच्या पत्नी यांच्यासह संपूर्ण घरत कुटुंबाने यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. समाजातील विविध स्तरांतील महिलांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

### सामाजिक विषमतेवर प्रहार

घरत कुटुंबियांनी एक धाडसी व विधायक पाऊल उचलले. समाजात अनेकदा विधवा किंवा विभक्त महिलांना शुभ कार्यात दुय्यम स्थान दिले जाते. मात्र, या अनिष्ट प्रथेला छेद देत अशा महिलांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला. अशा उपक्रमांमुळे आमचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होते, अशी भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

# मोठ्या ट्रेलरने जुना मुंबई पुणे रस्ता जाम केला, दोन तासाने वाहतूक सुरळीत



**चौक : प्रतिनिधी**

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वर वावंढळ हद्दीत हॉटेल अरुण समोर मोठा ट्रेलर अडवा झाल्याने दोन तास वाहतूक कोंडी झाली होती.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वर वावंढळ हद्दीत हॉटेल अरुण समोर महिन्यातून किमान दोन वेळा वाहतूक कोंडी निर्माण होते. याबाबत एम एस आर डी यांना वारंवार सूचना देऊन देखील त्यावर कारवाई करण्यात येत नाही. ही घटना नेहमी त्यांच्या समोर घडत असते. आज दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास एक मोठा ट्रेलर क्रमांक चक४६ उङ ४४०६ हा अरुण हॉटेल परिसरातून निघून खोपोली दिशेकडे जात असताना पनवेल खोपोली आणि खोपोली पनवेल या दोन्ही रस्त्यांच्या मधोमध अडला,हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग खाली वर आहेत, त्यामुळे मोठ्या कण्याच्या गाड्या तेथे मधोमध अडकतात,आणि दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी निर्माण होते. वाहतूक कोंडी दोन किमी. वर गेली,ही माहिती चौक प्रभारी विशाल पवार यांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली,

त्यांनी तीन जेसीबी व एक हायड्रा ट्रेलर यांच्या मदतीने ट्रेलर उचलून रस्त्यावर आणण्यात आला, दोन तासांच्या अथक प्रयत्नाने वाहतूक कोंडी सुटली. चौक पोलीस आणि वाहतूक पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

## वाहनांवर कारवाई

**अलिबाग :** वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २४४ व्यक्तींवर शनिवारी (दि.२४) कायदेशीर कारवाई केली.

वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून २,६४,५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## रोहा पंचक्रोशी जंगम समाज महिला कार्यकारणी जाहीर



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा पंचक्रोशी जंगम समाज महिला कार्यकारणी कमिटी जाहीर झाले असुन या कमेटीच्या अध्यक्षपदी प्रिया श्रीकांत जंगम यांची निवड करण्यात आली.

कार्यकारणी निवडीच्या वेळी श्यामल जंगम, सुमन जंगम, रसिका जंगम, अनिता जंगम, कुंदा जंगम, प्रणाली जंगम, रुचिता जंगम, सुनिता जंगम, साक्षी जंगम, जंगम समाजाचे उपाध्यक्ष मनोहरस्वामी जंगम, सचिव विनोदस्वामी जंगम, सहसचिव विरेंद्रस्वामी जंगम, खजिनदार अरुणस्वामी जंगम, किरणस्वामी जंगम, प्रकाशस्वामी जंगम, दिंगबरस्वामी जंगम, अनंतस्वामी जंगम, सल्लागार काशिनाथ स्वामी, कृष्णा स्वामी, माजी उपाध्यक्ष अनंत स्वामी गणेश स्वामी, मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यकारिणी मध्ये अध्यक्ष प्रिया श्रीकांत जंगम, उपाध्यक्ष प्रतीक्षा गणेश जंगम, सचिवसुखदा किरण जंगम, सहसचिव स्मिता विरेंद्र जंगम, खजिनदार. ऋतुजा रुपेश जंगम, सह खजिनदार रुपाली जंगम, सल्लागार. अस्मिता जंगम, सल्लागार विद्या जंगम, सदस्य प्रगती जंगम,सारिका जंगम, स्नेहल संदेश कुमारी. रुचिता जंगम,विजया सरसंबे यांची निवड करण्यात आली

## न्यायालयीन सुनावणीत विकास गोगावलेंसह शिवसेनेच्या आठ जणांना जामीन मंजूर

**महाड : प्रतिनिधी**

महाड निवडणूक शिवसेना राष्ट्रवादी राड्या प्रकरणी काल झालेल्या न्यायालयीन सुनावणीत पोलिसांना शरण आलेल्या विकास गोगावलेंसह महेश गोगावले, विजय मालुसरे, प्रशांत शेलार,धनंजय मालुसरे, वैभव मालुसरे, सुरज मालुसरे,सिद्धेश शेठ या आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला असून राष्ट्रवादीकडून शरण आलेल्या हनुमंत जगताप, श्रेयश जगताप, धनंजय देशमुख,जगदीश पवार, निलेश महाडिक या पाच जणांना न्यायालयाने आज सोमवारी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांनी दिली आहे.

या गुन्ह्यातील राष्ट्रवादीचे मुख्य आरोपी सुशांत जाबरे हे शनिवारी उशिराआपल्या अन्य तीन साथीदारांसह पोलिसांना शरण आले होते, त्यांना न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. महाड नगरपरिषद निवडणूक मतदानाच्या दिवशी झालेल्या या हिंसाचार प्रकरणामुळे गेल्या एक महिन्याहून अधिक काळ राज्यभरात मोठी चर्चा सुरू होती. या प्रकरणात दाखल परस्परविरोधी गुन्ह्यांमध्ये उच्च न्यायालयाने सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले होते. त्यानंतर अनेक आरोपी पोलिसांना गुंगारा देत फरार होते. दोन्ही बाजूंकडील प्रत्येकी तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात होते, तर उर्वरित आरोपी सुमारे महिन्याहून अधिक काळापासून फरार होते. अटकपूर्व जामीन फेटाळताना उच्च न्यायालयाने पोलीस प्रशासन व राज्य शासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करीत मुख्यमंत्र्यांनाही लक्ष केले होते.

## कर्जत भात गिरणी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी रवींद्र मांडे बिनविरोध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत भात गिरण सहकारी प्रक्रिया संस्था लिमिटेड दहिवली या संस्थेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. सहकारी अधिकारी सुनील दांगट यांनी निवडणुक अधिकारी म्हणून काम पाहिले आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत रवींद्र मांडे यांची संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



कर्जत भात गिरणी सहकारी संस्थेच्या अध्यक्ष पदाची निवडणूक कर्जत मार्केट यार्ड येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेत अध्यक्षपदाची निवडणूक घेण्यात आली असता अध्यक्ष पदासाठी संचालक रवींद्र मांडे यांनी अर्ज दाखल केला होता. त्यांचा एकमेव अर्ज दाखल झालेला असल्याने कर्जत भात गिरणी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.या बैठकीला भात गिरणी सहकारी संस्थेचे संचालक परशुराम घारे, शरद लाड, अनिल रोकडे, बाळू थोरवे, नामदेव मोडक, गोविंद जाधव, महादेव लोंगले, भगवान चव्हाण, नंदकुमार मोरे, प्रविण देशमुख, वंदना देशमुख, छाया वेखंडे आदी संचालक उपस्थित होते.

अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारताना रवींद्र मांडे यांनी 'संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संस्थेच्या फायद्यासाठी जे-जे निर्णय घ्यावे लागतील, ते सर्व सहकाऱ्यांच्या विश्वासात घेऊन व संमतीने घेतले जातील, असे सांगीतले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे, की मौजे-चिरनेर, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन **१) श्री. कमलाकर गोटू म्हात्रे, २) श्रीमती. अनिता उर्फ बेबी अनंत म्हात्रे, ३) श्री. सुनिल अनंत म्हात्रे, ४) श्रीमती. मंजुळा कृष्णा म्हात्रे, ५) श्री. मिथुन कृष्णा म्हात्रे, ६) श्रीमती. प्रणिता प्रविण राऊत आणि ७) श्रीमती. अश्विनी आकाश म्हात्रे** यांचे सातबारा सदरील नावे असलेल्या, त्याच्या वहिवाटीतील व ताबे कब्जातील तसेच त्यांच्या सामाईक मालकीची ही शेतजमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-चिरनेर, तालुका-उरण, जिल्हा-रायगड.**

| गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| २२५ | २१ | ०-०६-००<br>पो.ख. ०-००-०<br>एकुण ०-०६-०० | ०.२२ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याची हमी सदरहू मिळकतीच्या मालकांनी दिलेली आहे. तरीही वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, गहाण, साठेकरार फरोक्त, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, दावा, वगैरे अशा संदर्भात कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकती दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे.

वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तकार न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा अगर हितसंबंध नाही, असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तकारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी

**ठिकाण पनवेल**
**तारिख २५/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड. सुभाष किसन वास्कर**
**(बि.एस्सी., एम.बी.ए., एलएल बी.)**

कार्यालय : **८८, पहिला मजला, बिल्डिंग नं. ३, पनवेल महानगरपालिका संकुल, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड. नवी मुंबई ४१०२०६, मोबाईल: ८१६९४२६२९६**

# १११११ फूट तिरंगा यात्रेतून राष्ट्रभक्तीचा जागर

## अभाविप नवी मुंबईचा उपक्रम ▌ हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), नवी मुंबई यांच्या वतीने शुक्रवारी १११११ फूट भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. युवक सप्ताह आणि नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेत नवी मुंबई परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यात्रेचा प्रारंभ वाशी येथील ब्ल्यू डायमंड चौक येथून झाला. हातात तिरंगा ध्वज, अंगावर राष्ट्रभक्तीचा अभिमान आणि ओठांवर भारत माता की जय, वंदे मातरम्, जय हिंद अशा घोषणांसह विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण केले. ही यात्रा सेक्टर १०ए, वाशी येथील साईनाथ एज्युकेशन ट्रस्टच्या राजीव गांधी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे पोहोचून संपन्न झाली.



संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी आणि उत्साहाने भारावून गेला होता.

या कार्यक्रमास उद्योजक नारायण भार्गव, आलोक अग्रवाल, खेलो भारतच्या संयोजक अर्पिता मलिक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेशमंत्री राहुल राजोरिया तसेच राजीव गांधी कॉलेजचे प्राचार्य डॉ. बासुकीनाथ पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून युवकांनी केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी आणि देशहितासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर असल्याचे त्यांनी नमूद केले.

या भव्य तिरंगा यात्रेच्या यशस्वी आयोजनात राजीव गांधी कॉलेजचे विद्यार्थी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व समन्वय अभाविप नवी मुंबई जिल्हा विद्यार्थी विस्तारक डॉ. अक्षय शेट यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. याशिवाय अभाविप नवी मुंबई संघटनेचे प्रेम जाधव, सर्वेश अफजलपूरकर, शिव शिरसाट, आयुष कश्यप यांच्यासह शंभरहून अधिक स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने कार्य करत कार्यक्रम यशस्वी केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक बळकट झाली असून समाजात सकारात्मक संदेश पोहचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# चोरट्यांनी गुरांसोबत तरुणालाही गाडीत डांबले; उरणमधील घटना

## सतर्क नागरिकांमुळे चोरटे जेरबंद

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील चाणजे परिसरात रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास एखाद्या चित्रपटालाही मागे टाकेल असा थरार पाहायला मिळाला जनावरे चोरण्यासाठी आलेल्या टोळीने त्यांना हटकणाऱ्या तरुणाचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला, मात्र तरुणाची सतर्कता आणि गावकऱ्यांच्या धाडसामुळे चोरट्यांची गाडी उलटली आणि उरण पोलिसांनी तीन चोरट्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

चाणजे ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच अजय म्हात्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास उमेश महादेव कोळी हा तरुण कामावरून घरी परतत असताना त्याला काही अज्ञात व्यक्ती फोरविलर गाडीतून गुरे पळवताना दिसल्या. उमेशने त्यांना जाब विचारला असता चोरट्याने त्यालाच पकडून गाडी





डांबले आणि गुरांसोबत बांधून पळवून नेण्याचा प्रयत्न केला.

गावकऱ्यांनी गाड्या काढून चोरट्यांच्या तवेरा गाडीचा पाठलाग सुरू केला. गावकऱ्यांची जिद्द पाहून चोरट्याने वेगाने गाडी पळवण्याचा प्रयत्न केला, मात्र या धावपळीथ चोरट्यांची गाडी रस्त्याच्या कडेला पलटी झाली. मोठा आवाज आणि आरडाओरडा झाल्याने परिसरातील नागरिक जागे झाले.

गुरांसोबत आपल्या गावातील तरुणालाही बांधून नेल्याचा राग आल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी चोरट्यांना घटनास्थळी चांगला चोप दिला. माहिती मिळताच उरण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन तीन चोरट्यांना ताब्यात घेतले आणि त्यांची गाडी जप्त केली. पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून या घटनेवर पोलिसांनी बारीक लक्ष ठेवले असून पुढील तपास सुरू आहे.

शेतकऱ्यांनी, नागरिकांनी रात्रीच्या वेळी सतर्क रहावे असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमेत ११.५ किलो पिशव्या जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांमध्ये सातत्य राखण्यात येत असून दि. २२ जानेवारी रोजी ५ व्यावसायिकांकडून रू. २५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि ७ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांच्या साठा जप्त करण्याप्रमाणेच सलग दुसऱ्या दिवशीही २३ जानेवारी रोजी राबविण्यात आलेल्या मोहीमेत २ व्यावसायिकांकडे प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने रू. १० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि ११.५ कि.ग्रॅ. प्लास्टिक



पिशव्यांचा साठा जप्तीची धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

यामध्ये वाशी विभागात पाच हजार दंडवसूली व १ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांची जप्ती तसेच तुर्भे विभागात पाच हजार दंडवसूली आणि ३.५ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. प्लास्टिकमुक्त नवी मुंबई करिता विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबविण्यात येत आहेत. याविषयी केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने विशेष मोहीमा राबविण्यात येत आहेत.

प्लास्टिकचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा व एकल वापर प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर पूर्णपणे थांबवावा आणि कापडी पिशव्यांचा पर्याय स्विकारावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# क्रांतिज्योती विद्यालय सिनेमा करमुक्त करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांनुसार अभ्यासक्रमातील अवघड संकल्पना लवकर समजण्यासाठी प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतुन किंवा स्थानिक समुदायात बोलल्या जाणाऱ्या भाषेतुन होणे गरजेचे आहे.

सध्या गाजत असलेला क्रांतिज्योती विद्यालय हा चित्रपट देखील हाच संदेश देत आहे. यासाठी हा सिनेमा अधिकाधीक घरांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. हा चित्रपट करमुक्त केल्यास जास्तीत जास्त लोकांपर्यंत तो पोहोचेल व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होईल. याबाबतचे निवेदन शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना देण्यात आले.

या वेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने, क्रांतिज्योती विद्यालयाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे,निर्माती क्षिती जोग, अभिनेते अमेय वाघ, हरेश दुधाळे, शिक्षण क्रांती संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस, कोकण विभाग कार्यवाह ज्ञानेश्वर गोसावी, उल्हासनगर महानगर अध्यक्ष राजेंद्र गवळी, ठाणे महानगर अध्यक्ष किशोर राठोड हे उपस्थित होते.

मातृभाषेतुन शिक्षण घेणाऱ्या मुलांना शैक्षणिक संकल्पना दृढ झालेल्या असतात त्यामुळे उच्च शिक्षण घेताना त्यांना अध्ययनात अडचणी येत नाही व पुढील शिक्षण सहज होते, परंतु इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतल्यास मुलं हुषार होतात असा गैरसमज पालकांच्या मनात झालेला आहे. क्रांतिज्योती विद्यालय चित्रपट पाहिल्यास हा गैरसमज दुर होऊन मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व पालकांच्या लक्षात येईल असा विश्वास सुधीर घागस यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याजवळ व्यक्त केला.

चित्रपट करमुक्त करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पाचांळ यांनी चित्रपटाची टीम व शिक्षण क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले.

# वाशी येथे पराक्रम दिवस समारोह साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृति संस्थान आयोजित नेताजी यांच्या १२९व्या जयंती दिनी वाशी शहरात पराक्रम दिवस समारोह आयोजित करण्यात आला होता. या वेळी इतिहास संशोधक डॉ.एन. के. उपाध्याय यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी उत्तर भारतीय नेते एस.सी. मिश्रा, सरदार वल्लभभाई पटेल संस्थेचे अध्यक्ष व अपना दल पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी महेंद्र वर्मा, सर्वधर्मीय विकास मंचाचे अध्यक्ष मेघनाथ भगत, राजेश शर्मा, रामप्रीत राय यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पराक्रमी जीवनावर आपले विचार भाषणात मांडले. यावेळी कवि व लेखक त्रिलोचन सिंह अरोरा, मंजू गुप्ता, दिनेश मंत्री, स्वर्णलता प्रधान, संतोष शुक्ला वरिष्ठ पत्रकार विनोद प्रधान, सुरेंद्र सरोज आदी उपस्थित होते.



# चिरनेरमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती माघी गणेशोत्सवाचे औचित्य साधून, श्री गणपती देवस्थान चिरनेर व ग्रामस्थ मंडळ चिरनेर मुळपाडा यांच्या वतीने, येथील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने येणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, मायेची शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. श्री गणपती देवस्थानचे विश्वस्त व गाव कमिटीचे सभासद आदी उपस्थित होते.

माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्रींचा जन्मोत्सव, पालखी मिरवणूक व महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम भव्य स्वरूपात पार पडले.त्याला येथील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन सहकार्य केले असल्याची माहिती श्री गणपती देवस्थानचे सचिव अमर ठाकूर यांनी या वेळी दिली. या अनुषंगाने रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी स्टेप ऑफ आर्टच्या सादरीकरणातून नृत्य अविष्काराचा कार्यक्रम सादर करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. गणेश जयंतीच्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गणपती देवस्थानचे सचिव अमर ठाकूर यांनी केले. गणेश जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी चिरनेर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

# युवा चित्रकार वरद गावंडचे चित्रकला विषयावर प्रात्यक्षिक

**उरण : बातमीदार**

युसुफ मेहर अली सेंटर संचलित भानूबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तारा येथे विद्यार्थ्यांसाठी 'प्रवास चित्रकलेचा' या विशेष उपक्रमांतर्गत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात उरणचे सुपुत्र, युवा चित्रकार वरद खुशाली विलास गावंड यांनी इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसमोर शाळेतील शिक्षिका रवीना म्हात्रे यांचे 'व्यक्तिचित्र' रेखाटण्याचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि रचनात्मक वैचारिक वृद्धी व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

चित्रकला ही केवळ कागदावरील रंगकाम नसून ती विचारांना दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे. सृजनशीलतेमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चित्रकला विषयाबद्दल नवचैतन्य निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.



# युईएस कॉलेजमध्ये उडान महोत्सव उत्साहात

**उरण : बातमीदार**

युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजी आणि कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित केला जाणारा उडान महोत्सव युईएस महाविद्यालयात जल्लोषात साजरा झाला.

ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या हस्ते झाले. या वेळी यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, सदस्य व माजी अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाचे सी.ई. ओ प्रदीप श्रृंगारपुरे व प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे, यु. ई. एस. कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, सिनिअर कॉलेजच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख मनाली तांबडकर आणि वाणिज्य विभागाच्या प्रमुख वर्षा वीर, डीएलएलईचे समन्वयक प्रा.विनोद इंदुलकर (के. डी. एस. कॉलेज), हेमांगी म्हात्रे व अक्षय निवांगुणे (यु. ई. एस. कॉलेज) तसेच शिक्षकगण व शिक्षेकतर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉ. बळीराम एन. गायकवाड यांचे स्वागत यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर ह्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना व गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी उडाण महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाच्या वतीने करण्यात येते. या महोत्सवात पोवाडा गायन, पथनाटय, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व व क्रिएटिव्ह लेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या महोत्सवात नवी मुंबई, उरण, पनवेल, अलिबाग, पेण परिसरातील एकूण २१ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. त्यात एकूण ३८० स्पर्धक विद्यार्थी, ६० स्वयंसेवक व ४० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, असे एकूण ४८० जण कार्यक्रमासाठी उपस्थित होते.



# अवयवदान करून निर्माण केला आदर्श

**नवी मुंबई :** सानपाडा येथील मिलेनियम टावर बी टाइप हाऊसिंग सोसायटीत राहणारे परंतु प्रसिद्धीपासून



नेहमीच दूर असणारे सामाजिक कार्यकर्ते अनंत रेवाळे यांचे नुकतेच वयाच्या ६४ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पत्नी शुभांगी, विवाहित मुलगी, जावई व नात असा परिवार आहे.

अनंत रेवाळे यांच्या आकस्मिक निधनाने व्यथित झालेले असताना, त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या अवयवांचे दान करून काही व्यक्तींच्या जीवनात आनंद निर्माण करून समाजापुढे मोठाच आदर्श निर्माण केला, याचा गौरवपर उल्लेख बहुतेक वक्त्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना केला.

अनंत रेवाळे हे मूळ रायगड जिल्ह्यामधील महाड तालुक्यातील वलंग या गावाचे होते. महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर ते भारत सरकारच्या भविष्य निर्वाह निधी खात्याच्या वांद्रे येथील कार्यालयात नोकरीस लागले. या सेवेत असताना त्यांनी कामगार संघटनेमार्फत आणि स्थानीय लोकाधिकार समितीमार्फत कामगारांची चांगली सेवा केली. या शिवाय ते न्यू इंग्लिश स्कूल, वलंग या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. महाडमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील अनेक अनाथ मुलांना उच्च शिक्षण देण्यात त्यांचे फार मोठे योगदान होते. नवी मुंबई रोटरी क्लबमध्येही त्यांनी चांगले कार्य केले.

# आरोग्य शिबिरास भरभरून प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर ३६५ व डी आर व्ही चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकूट मैदान, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षस्थान डॉ. धर्मेंद्र कुमार, चेअरमन डॉक्टर ३६५ यांनी भूषविले. शिबिराचे आयोजन आयएनओ चे अध्यक्ष डॉ. अनंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेता तुषार कपूर यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच डॉ. प्रतिभा बागवे, डॉ. मुकेश दिल्ली व त्रिभुवन यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. पनवेल तालुक्यातील स्नेहलता निसर्गोपचार आश्रम, शांतिवन यांच्या वतीने या शिबिराचे नेतृत्व डॉ. कमल सिंह कटारा यांनी केले. त्यांना डॉ. सोनिया वर्मा, डॉ. शुभदा शर्मा व डॉ.




अश्विनी वाघमारे यांच्या अनुभवी वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. या आरोग्य शिबिराचा मुख्य उद्देश चित्रपटसृष्टीतील कलाकार व कर्मचारी यांना निसर्गोपचाराद्वारे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा देणे हा होता. पादाभ्यंग यासारख्या शरीरशुद्धी (डिटॉक्सिफिकेशन) उपचार व्हायब्रेटर मसाज व कोल्ड लेप द्वारे वेदना व्यवस्थापन दमा, सर्दी, खोकला व उजझऊ रुग्णांसाठी तुळशीच्या पानांनी वाफ उपचार जीवनशैली सल्ला व मार्गदर्शन इतर विविध निसर्गोपचार पद्धती शिबिरात उपचार व सेवा देण्यात आल्या.

या शिबिरात दीपक पराशर, गुलशन राणा, अरमान, कुर्शाद, उपासना तसेच इतर चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांना उपचार व वैद्यकीय सल्ला देण्यात आला. एकूण १२० रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

सर्व रुग्णांनी उपचारांबाबत समाधान व्यक्त केले व शिबिरास भरभरून प्रतिसाद मिळाला. हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पडले असून, भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याची बांधिलकी डॉक्टर ३६५, डी आर व्ही चारीटेबल ट्रस्ट व स्नेहलता निसर्गोपचार आश्रम यांनी व्यक्त केली.

# बोरघाटातील वाहतूक कोंडी सुटता सुटेना

## दुसऱ्या दिवशीही सात किमी वाहनांच्या रांगा



**खालापूर ; प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर, व जुन्या महामार्गावरील बोरघाटात दुसऱ्या दिवशीही प्रचंड वाहतूक कोंडी झाली. अमृताजण ब्रिज ते खोपोली बायपास अश्या ७ ते ८ किमी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या तर मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातही अंडा पॉईंड जवळ वाहतूक कोंडी झाली होती. सलग सुट्या आल्याने परिसरात काल आणि आज या दोन दिवसात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. एक्सप्रेसवेवरील अमृतांजन ब्रिज ते खोपोली एक्झीट दरम्यान ही वाहतुक कोंडी झाली आहे.

मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र होते. दुसऱ्या दिवशीही पर्यटक आणि प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असलल्याने याचा परिणाम वाहतुकीवर झाला आहे. घाटात तब्बल सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यातच काही अवजड वाहनांनी लेन शिस्त न पाळता वाहने दामटवली तर २५ वाहनांची क्लचप्लेट निकामी झाले व वाहने मार्गामधेच थांबली याने वाहतूक कोंडी अधिकच तीव्र झाली आहे.

परिस्थती नियंत्रणातआणण्यासाठी महामार्ग पोलिसांकडून दर पंधरा मिनिटांनी वाहतूक ब्लॉक घेऊन हळूहळू वाहने पुढे सोडली जात होती. बोरघाटातून प्रत्येक दिवशी सरासरी ४० ते ५० हजार वाहनांची वर्दळ असते परंतु सलग सुट्या असल्याने लाखाच्या आसपास वाहने मार्गावर आल्याने वाहतूक कोंडी अधिकच बिकट झाली असल्याचे मत बोरघाट पोलिस निरीक्षक पाटील यांनी सांगितले. तर खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी महामार्गालगत अनधिकृत टपऱ्या उभारल्या असल्याने वाहन चालक पाणी चहा बिस्किटे घेण्यासाठी वाहने थांबवीत असल्याने वाहतूक ठप्प होत असल्याचे सांगितले.

खोपोली गावात महामंडळाची एसटी बस बंद पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती. तर शिळफाटा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सारसण अशी पेण खोपोली मार्गावर तसेच पाली फाटा येथे इमाजीका पार्क साठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढल्याने हे दोन्ही मार्ग दुपारपर्यंत ठप्प होते.

# मुरूड नगर परिषदेकडे स्वच्छता गृहाची निगा राखण्याची मागणी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात मुरुड नगर परिषदेने एकमेव मुतारी व शौचालय लोकांच्या सेवेसाठी बांधले आहे.परंतु याची निगा व्यवस्थित न राखल्याने यात बकालपण आल्याने प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.या बाबत समाजसेवक अरविंद गायकर यांनी वेळीच लक्ष देण्याची मागणी केली असून लोकांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.या बाबत त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, मुरुड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले कल्याणी हॉस्पिटल शेजारी रिक्षा स्टॅन्ड लगत सार्वजनिक शौचालय आहे. मध्यवर्ती ठिकाण असल्याने शौचालयाची आवश्यक्ता आहे. पण सध्या असलेले शौचालयाची परिस्थिती भयानक आहे.`

सदरचे ठिकाण हे मनुष्य वस्तीने गजबजलेले असून मार्केट असल्याने अनेक नागरीक तेथे खरेदीकरीता व एस.टी. स्टॅन्ड मधुन अनेक प्रवासी वफ ये-जा करीत असतात या सर्वाच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून हे खूप हानिकारक आहे. आजूबाजूला वस्ती असून आजूबाजूला छोटे छोटे हॉटेल असून रहदारीचा मार्ग आहे. लोकांची येण्या जाण्याचा मार्ग आहे. रिक्षा स्टॅन्ड आहे स्थानिक येजा करतात पर्यटक ये जा करतात ते शौचालय बघून लाज वाटते इतकी अस्वच्छता आहे की विचारून सोय नाही तेथे अशरक्षः घाणीचं पाणी रोडवर येतं इतकी दुर्गंधी आहे. या त्रासाला आजूबाजूचे राहणारे दुकानदार खूप त्रासलेले आहेत

हा विषय आरोग्याच्या निगडित असताना व बाजूला हॉस्पिटल आहे. शौचालयाच्या बाहेरची परिस्थिती एवढी घाणेरडी आहे.त्याच्यापेक्षा आतली परिस्थिती सुद्धा खूप घाणेरडी आहे. याकडे मुरुड नगर परिषदेने गांभीर्यान लक्ष द्याव, अशी मागणी करण्यात आली आहे.

# इंटरनॅशनल इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे फिल्म सिटीतर्फे तळा हायस्कूलमध्ये मार्गदर्शन शिबीर



**तळा : प्रतिनिधी**

इंटरनॅशनल इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे फिल्म सिटीच्या वतीने तळा येथील बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, गो. म. वेदक विद्यामंदिर ज्युनियर व सिनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी एक उपयुक्त व मार्गदर्शक शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. या कार्यक्रमात ८१ वर्षाच्या क्लबच्या उपाध्यक्षा कला कर्णिक यांनी स्पर्श कसा ओळखावा? तर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स अँड टाईम मॅनेजमेंट या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. स्वाती देसाई यांनी गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या विविध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. एकता चौधरी यांनी इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी भावनांवर नियंत्रण कसे मिळवावे? आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनींना कॅन्सर सर्वायव्हल जनजागृती आणि राजस व तामस अशी अन्नपदार्थाची ओळख करून दिली. यावेळी डॉ. ज्योती खंबाटा यांनी सैनिक होण्यासाठी आवश्यक पात्रता व तयारी याविषयी माहिती देत विविध मनोरंजनात्मक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

या कार्यक्रमाला तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मंगेश देशमुख, सचिव महेंद्र कजबजे, खजिनदार चंद्रकांत रोडे, इंटरनॅशनल इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे फिल्म सिटीच्या अध्यक्षा मधुरता देशमुख, सचिव डॉ. एकता चौधरी, खजिनदार अनिता गोएल, उपाध्यक्षा कला कर्णिक, क्लब करस्पाँडंट डॉ. ज्योती खंबाटा सदस्या राजलक्ष्मी एन. व्ही., पद्मा गोपालकृष्णन, डॉ. स्वाती देसाई, वीणा खट्टर, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. क

लबच्या वतीने प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी विविध गेम्स, पझल्स, पुस्तकं, घसरगुंडी झोपाळे असे साहित्य दिले. बालवाडी आणि प्राथमिकच्या सर्व विद्यार्थ्यांना क्रेयॉन्स, पेन्सिल व पट्ट्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमाचे नेतृत्व क्लबच्या अध्यक्षा मधुरता देशमुख यांनी केले. यावेळी अध्यक्षा मधुरता देशमुख म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास नव्हे तर मानसिक बळ, योग्य मार्गदर्शन आणि सुरक्षिततेची जाणीव असणे तितकेच आवश्यक आहे. या क्लबच्या माध्यमातून आम्ही समाजातील विद्यार्थ्यांपर्यंत हे मार्गदर्शन पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत.

# कोटेश्वरी प्रतिष्ठानचा विघ्नहर्ताचे थाटामाटात विसर्जन



**मुरूड : प्रतिनिधी**

चौदा विद्या चौसष्ठ कलां'चा अधिपती असलेल्या गणपती बाप्पाचा माघ महिन्यातील जयंती उत्सवाला आजपासून सुरूवात झाली असून त्यांचे औचित्य साधून मुरूड शहरातील गाव भैरव मंदिरातील प्रांगणात कोटेश्वरी प्रतिष्ठानच्या वतीने २२/१/२०२६ सकाळी सिध्देश मिसाळ यांच्या कारखान्यातुन वाजत गाजत कोटेश्वरी प्रतिष्ठान विघ्नहर्ता ची स्थापना करण्यात आली.या पुजेचा मान ओम भगत यांना मिळाला.तर उत्तर पुजेचा मान अर्थव सुभेदार यांना मिळाला.

पोरहित आशिष जोशी यांच्या कडुन ही पुजा सांगण्यात आली.मुरुड शहरात प्रथमच माघ गणेश जयंती निमित्त श्रीगणेशा ची मुर्ती स्थापन केल्याने असंख्य श्रीगणेश भक्तगणाची दर्शनासाठी गर्दी केली होती.याठिकाणी किर्तन भजन ठेवण्यात आले होते भक्तगणांना प्रसादाचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच यावेळी अध्यक्ष अर्थव सुभेदार, उपाध्यक्ष ओम भगत सचिव ओजस गुरव,प्रज्वल गुरव, अजिंक्य गुरव,पंकज गुरव,सर्वश भगत, अनिकेत गुरव,धिरज भगत,अतिष भगत,प्रति गुरव,मिताली गुरव, श्रुती गुरव , अंकिता गुरव अनुजा गुरव,अर्तिका गुरव आदिंसह श्रीगणेश भक्तगण उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी कोटेश्वरी प्रतिष्ठान विघ्नहर्ताची भव्य मिरवणूक शहरातील भोगेश्वर नाक्यावरुन , बाजारपेठ, येथुन समुद्रकिनाऱ्यां पर्यत बेंजो च्या तालावर गुलाल उधळत फटक्यांची आतिषबाजी करत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती . यावेळी येणाऱ्या जाणाऱ्या पेठचा प्रसाद वाटप करण्यात आले होते. भव्य मिरवणूकी मध्ये महिला सह तरुण तरुणींनी चा सहभाग होता यावेळी मुरुड पोलिस यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मंत्री तटकरे प्रचारार्थ आज नागोठण्यात

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार किशोर जैन व नागोठणे पंचायत समिती गणातील उमेदवार समृद्धी संतोष कोळी यांच्या प्रचारार्थ सोमवार दि. २६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री नामदार अदितीताई तटकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेस नागोठणे विभागातील ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके यांनी केले आहे. ना.अदितीताई तटकरे यांच्या नागोठण्यातील सभेस जिल्हा परिषद उमेदवार किशोर जैन, नागोठणे पंचायत समिती उमेदवार उपस्थित राहणार आहेत.

# चालक दिना निमित्त महाड एसटी आगारातील चालकांचा सन्मान



**महाड : प्रतिनिधी**

चालक दिनाच्या निमित्ताने महाड आगारामध्ये विना अपघात सेवा बजावणाऱ्या चालकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. महाड डेपोचे आगार प्रमुख रितेश फुलपगारे यांनी या चालकांचा सन्मान केला.

२४ जानेवारी हा चालक दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या औचित्य साधत महाड डेपोतील ५३ चालक आणि ५९ चालक तथा वाहक अशा एकूण ११२ चालकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान केला. त्याचबरोबर या चालकांना एसटीचे व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर माधव कुसेकर यांच्या सहिचे आवाहन पत्र देखील देण्यात आले. या आवाहन पत्रानुसार एसटीने सलग ७७ वर्ष अविरत सेवा बजावताना दर्जेदार सेवा आणि प्रवाशांचे हित संभाळण्याचे काम केल्याचे म्हटले आहे. सुरक्षित प्रवासासाठी एसटी हा एकमेव विश्वासार्थ पर्याय असल्याने ज्याचालकांनी विना अपघात सेवा बजावली आहे अशा चालकांचा सन्मान करण्यात आला.

महाड आगारप्रमुख रितेश फुलपागर यांनी या चालकांचा सन्मान केला. यावेळी वाहतूक कंट्रोलर उदय हाटे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक असिफ जटाम, ए. डी. शिरणामे, महेंद्र मारणे, हे उपस्थित होते. यावेळी व्ही. डी. राठोड, व्हि. डी. शिंदे, आर. एस. करपाते, ए. एस. देशमुख, के. पी. दडस, बी. एम. कोटे, एम. आय. सुरवसे, एस. एल. कवले, डी डी दराडे यांच्यासह ११२ चालकांचा समावेश आहे. या चालकांनी विना अपघात सेवा बजावली आहे त्यांचा अभिमान वाटतोअसे रितेश फुलपगारे यांनी सांगितले.

# सुधागडात पुन्हा पसरली बिबट्याची दहशत

## सोमवारी संतप्त ग्रामस्थ वन विभाग कार्यालयावर धडकणार



**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात बिबट्याने मानवी वस्तीत अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. आता बिबट्याने आपल्या पंजाची दहशत सुधागड वासियांच्या मनावर ही पसरवायला सुरवात केलीय. सुधागड तालुक्यातील पाच्छापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला बिबट्याचा थरार आता अधिकच गंभीर वळणावर पोहोचला आहे. शुक्रवारी (ता.२३) संध्याकाळी म्हशी शोधण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्याचा बिबट्याशी आमनासामना झाल्याची घटना घडली. यामुळे परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण आहे. वनविभागाकडून मात्र हल्ला केल्याची 'अफवा' असल्याचे स्पष्टीकरण दिले गेले आहे. परिणामी वनविभागाच्या भूमिकेबद्दल ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रश्नी आता सोमवारी (ता. २६) ग्रामस्थ वनविभागाच्या कार्यालयावर धडक देणार आहेत.

शनिवारी (ता.२४) वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांसोबत संवाद साधला मात्र गावकऱ्यांनी वन विभागाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला. तसेच गावकरी कोणतीही अफवा पसरवत नसल्याचे सांगून प्रत्यक्षदर्शी यांनी आपला अनुभव सांगितला.

पाच्छापूर येथील रहिवासी गणपत बरगे हे शुक्रवारी (ता. २३) संध्याकाळी आपली म्हैस शोधण्यासाठी रानात गेले होते. यावेळी अचानक एक मादी बिबट्या आपल्या पिल्लासह त्यांच्या समोर आली. ही मादी बिबट्या दबक्या पावलाने त्यांच्याकडे येत असल्याचे पाहून बरगे यांनी प्रसंगावधान राखले आणि तातडीने जवळच्या झाडावर चढून आपला जीव वाचवला. त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीला धावून आले, तेव्हा बिबट्या तिथून निघून गेला. सोबत पिल्लू असल्यामुळे मादी बिबट्या झाडावर चढली नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता, असे बरगे यांनी सांगितले. या घटनेच्या धसक्यामुळे बरगे कुटुंबीयांनी आपली पोल्ट्री सोडून गौळमाळ येथे आपल्या शेजारील गावी जाऊन आश्रय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी येथील असानेवाडी येथील एका शेतकऱ्याच्या गाईला बिबट्याने मारले आहे.

***बिबट्याने हल्ला केल्याची बातमी चुकीची आहे. बिबट्याचा वावर परिसरात असला तरी त्याने अद्याप कोणत्याही नागरिकावर किंवा प्राण्यावर हल्ला केलेला नाही. काही व्यक्ती खोटी माहिती पसरवून दहशत निर्माण करत आहेत, अशांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये. वनविभाग परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून असून आवश्यक ती खबरदारी घेत आहे.***

***-विशाल सोनवणे,***
***वनपरिक्षेत्र अधिकारी,***
***सुधागड-पाली.***



**मुरूड : सलग ३ दिवस सुट्टी असल्याने मुरुड जंजीरा किल्ला पहाण्यासाठी मोठी गर्दी झाली. बोट कमी आणि पर्यटक जास्त असल्याने पर्यटकांना किल्ल्यात जाण्याचे तिकीट न मिळाल्याने अनेकांना किल्ला न पहाताच परत जावे लागले.** (छाया : सुधीर नाझरे)

# पाकिस्तानचे वरातीआधीच घोडे

## वर्ल्डकप खेळण्याच्या निर्णयाआधीच संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि अतरंगी घडामोडी यांचं नातं जुनं आहे. बांगलादेशने टी२० वर्ल्डकपमधून माघार घेतल्याप्रकरणी पाठिंबा म्हणून पाकिस्तान क्रिकेट बोर्डही स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याच्या विचारात आहे. पडद्यामागे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि सरकार यांच्यात यासंदर्भात बोलणी सुरू असताना पाकिस्तानने स्पर्धेसाठी संघ जाहीर केला आहे. वर्ल्डकपसाठी तयारी म्हणून पाकिस्तानचा संघ मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी२० मालिका खेळणार आहे. त्या मालिकेसाठी जाहीर संघाशी मिळताजुळता असा संघच पाकिस्तानने जाहीर केला आहे.

निवडसमिती म्हणून आमचं काम संघ निवडणं आहे आहे. आयसीसीने वर्ल्डकपसाठी संघनिवडीकरता निर्धारित तारीख दिली आहे. त्यानुसार आम्ही संघाची घोषणा केली. वर्ल्डकपमध्ये खेळायचं की नाही याचा निर्णय सरकार घेईल. मी त्यासंदर्भात काही बोलू शकत नाही असं पाकिस्तानचे मुख्य प्रशिक्षक आकिब जावेद यांनी सांगितलं.



सलमान अघाकडेच नेतृत्वाची धुरा कायम राखण्यात आली आहे. टी२० प्रकारात कमीत कमी चेंडूत जास्तीत जास्त धावा फटकावणे हे अत्यावश्यक मानलं जातं. स्ट्राईकरेट तगडा असणं फलंदाजांसाठी गरजेचं असतं. प्रदीर्घ काळ टी२० प्रकारात संथ स्ट्राईकरेटने खेळण्यावरून माजी कर्णधार बाबर आझमवर टीका करण्यात आली. ऑस्ट्रेलियात बिग बॅश स्पर्धेतही बाबरला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. टी२० प्रकारात कामगिरी सर्वसाधारण असतानाही बाबरला या संघात स्थान मिळालं आहे. बाबर आणि त्याचा सहकारी मोहम्मद रिझवान यांना टी२० संघातून डच्चू देण्यात आला होता. बाबरचं पुनरागमन झालं असलं तरी रिझवानला राष्ट्रीय संघात खेळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

अनुभवी फखर झमानकडून पाकिस्तानला मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. कामगिरीत सातत्य नसतानाही सईम अय्युबने संघात स्थान कायम राखलं आहे. अष्टपैलू फहीम अशरफमुळे संघाला संतुलन मिळालं आहे.

पाकिस्तान संघाने वर्ल्डकप खेळायचं ठरवल्यास त्यांचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला कोलंबो इथे नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. अ गटात पाकिस्तानसह भारत, अमेरिका, नेदरलँड्स आणि नामिबिया यांचा समावेश आहे. भारत–पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारीला कोलंबो इथे होणार आहे. २००७ मध्ये पहिल्यावहिल्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानने अंतिम फेरीत धडक मारली होती, मात्र भारताने थरारक विजय मिळवला होता. त्यानंतर दोन वर्षांनी पाकिस्तानने जेतेपदाची कमाई केली होती. त्यानंतर १७ वर्ष टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदाने पाकिस्तानला दुरावलं आहे.

**पाकिस्तानचा संघ**

सलमान अघा (कर्णधार), फखर झमान, साहिबजादा फरहान, अबरार अहमद, बाबर आझम, फहीम अशरफ, ख्वाजा नफाय, मोहम्मद नवाझ, सलमान मिर्झा, नसीम शहा, सईम अयुब, शाहीन शहा आफ्रिदी, शदाब खान, उस्मान खान, उस्मान तारीक.

# सुहित जीवन ट्रस्टच्या तीन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र आयोजित राज्यस्तरीय आंतरशालेय थलेटिक्स स्पर्धा नागपूर येथील रामटेक येथे नुकत्याच उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील विविध संस्थांमधून एकूण ३२० विशेष खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेतून सुहित जीवन ट्रस्टच्या तीन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली असून संस्थेतील या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट यशाबद्दल तसेच त्यांनी केवळ संस्थेचेच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव उंचावल्यामुळे समाजातील विविध स्तरांतून व समस्त महाराष्ट्रातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.



या स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्ट, पेण (जि. रायगड) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. १८ वर्षांवरील वयोगटात मनीष गणेश म्हात्रे याने २०० मीटर धावणे प्रकारात सुवर्णपदक पटकावले. १४ ते १८ वयोगटात अर्जुन पांडुरंग वारे याने २०० मीटर धावणे प्रकारात रौप्यपदक मिळवले, तर ६ ते १२ वयोगटात सिद्धीका मंदार पाटील हिने ५० मीटर धावणे प्रकारात सुवर्णपदक जिंकले.

या घवघवीत यशामुळे या तिन्ही विद्यार्थ्यांची शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी हरियाणा येथील महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या यशामागे पालक, संस्था व शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे.

# खारघरच्या श्रेयांक मुनीला एमसीएच्या अंडर १४मध्ये खेळण्याची संधी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अवघ्या १३ वर्षांच्या वयात सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि जिद्दीच्या जोरावर खारघर येथील श्रेयांक मुनी याची महाराष्ट्र राज्य अंडर–१४ क्रिकेट संघात निवड झाली आहे. गेल्या पाच वर्षांपासून दररोज पाच ते सहा तास कठोर सराव करणाऱ्या श्रेयांकने आपल्या कामगिरीतून निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले असून, या यशामुळे खारघरसह पनवेल परिसरात अभिमानाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोशिएशनने जाहीर केलेल्या १८ खेळाडुंच्या निवड यादीत श्रेयांक मुनी याचा समावेश झाल्यानंतर त्याचे प्रशिक्षक, पालकांसह शाळा व्यवस्थापनाकडून श्रेयांकचे कौतुक होत आहे. खारघरच्या रेडक्लिफ स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिक्षण घेत असलेला श्रेयांक हा लेग स्पिनर ऑलराउंडर आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या सांघिक सात सामन्यांमध्ये त्याने २७ बळी घेत प्रभावी गोलंदाजी केली. या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावरच त्याची महाराष्ट्र अंडर–१४ संघात निवड झाल्याची माहिती त्याचे क्रिकेट प्रशिक्षक विनय शिंदे यांनी दिली.

तंत्रशुद्ध गोलंदाजी, योग्य लाईन–लेंथ आणि सामन्यानुरूप डावपेच ही श्रेयांकची ताकद ठरली आहे. सध्या अहमदाबाद येथे सुरू असलेल्या आंतरराज्य अंडर–१४ क्रिकेट स्पर्धेत श्रेयांक महाराष्ट्र संघाकडून विविध राज्यांच्या संघांविरुद्ध सामने खेळत आहे. मोठ्या व्यासपीठावर आत्मविश्वासाने खेळताना तो संघासाठी उपयुक्त ठरत असल्याचे प्रशिक्षकांनी नमूद केले. प्रशिक्षक विनय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आपल्या खेळातील सातत्य, फिटनेस आणि मानसिक कणखरता अधिक भक्कम केली आहे.

श्रेयांकच्या यशामागे कुटुंबाचेही मोठे योगदान आहे. खारघर सेक्टर ३७ येथे राहणाऱ्या श्रेयांकची आई गृहिणी असून वडील मिथून हे नवी मुंबईतील एका डेटा सेंटरमध्ये खासगी नोकरी करतात. मुलाच्या क्रिकेटच्या आवडीला ओळखून पालकांनी वेळ, सुविधा आणि प्रोत्साहन देत त्याच्या प्रवासाला पाठबळ दिले.या निवडीबद्दल रेडक्लिफ स्कूलचे प्रशासन, शिक्षकवृंद, पालक आणि क्रीडाप्रेमींनी श्रेयांकचे अभिनंदन केले असून, त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. मेहनत, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास लहान वयातही मोठी स्वप्ने साकार होऊ शकतात, याचे श्रेयांक मुनी हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# दिल्लीने रोखला बंगळुरूचा विजयरथ

## नंदिनी-मिनूच्या प्रयत्नांवर मॅरिझान-लॉराने चढवला कळस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेच्या यंदाच्या हंगामात झंझावाती फॉर्मात असणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा विजयरथ अखेर दिल्ली कॅपिटल्स संघाने रोखला. पाचपैकी पाचही सामने जिंकणाऱ्या बंगळुरू संघाला दिल्लीने चीतपट केलं. बडोद्याच्या कोटंबी स्टेडियमवर झालेल्या मुकाबल्यात बंगळुरूला १०९ धावाच करता आल्या. दिल्लीने ७ विकेट्स आणि २६ चेंडू राखून दिमाखदार विजय मिळवला.



ग्रेस हॅरिस आणि स्मृती मानधना यांनी बंगळुरूला ३६ धावांची सलामी दिली. मॅरिझान कापने हॅरिसला बाद करत ही जोडी फोडली. तिने ९ धावा केल्या. स्मृतीने जॉर्जिआ वॉलच्या साथीने धावफलक हलता ठेवला. मिनू मामीने स्मृतीला बाद करत बंगळुरूला धक्का दिला. स्मृतीने ३४ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ३८ धावांची खेळी केली. श्री चरणीने गौतमी नाईकला तंबूत परतावलं. कापने वॉलला त्रिफळाचीत केलं. तिने ११ धावा केल्या. ऋचा घोष, नादिन डी क्लार्क यांच्याकडून बंगळुरूला मोठ्या खेळीची अपेक्षा होती, मात्र मनीने ऋचाला तर हेन्रीने क्लार्कला बाद केलं. राधा यादवने १८ धावांची खेळी करत प्रतिकार केला. बंगळुरूच्या तळाच्या फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. दिल्लीतर्फे नंदिनी शर्मान ३ तर चिन्ले हेन्री, मॅरिझान काप आणि मिनू मानी यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली. सायली सतघरेने वादळी खेळीसाठी प्रसिद्ध शफाली वर्माला माघारी धाडलं. तिने १६ धावा केल्या. भरवशाच्या लिझेल ली हिलाही सायलीनेच तंबूत धाडलं, मात्र यानंतर अनुभवी लॉरा वॉल्व्हडार्ट आणि कर्णधार जेमिमा रॉड्रिग्ज यांनी तिसऱ्या विकेटसाठी ४९ चेंडूत ५२ धावांची भागीदारी केली. राधाने जेमिमाला बाद करत ही जोडी फोडली. जेमिमाने २४ धावा केल्या. जेमिमा बाद झाल्यानंतर लॉराने सूत्रं हाती घेत संयमी खेळी साकारत दिल्लीला महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला.

या विजयासह दिल्लीचे ६ सामन्यात ६ गुण झाले आहेत. त्यांनी ३ सामने जिंकले तर ३ सामन्यात त्यांचा पराभव झाला आहे. गुणतालिकेत त्यांनी दुसऱ्या स्थानी आगेकूच केली आहे.

# सूर्यकुमार यादवने रघू यांना केला वाकून नमस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

टी–२० प्रकारात सव्वा वर्षाचा अर्धशतकाचा दुष्काळ संपवत भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या लढतीत निर्णायक भूमिका बजावली. न्यूझीलंडने दिलेल्या २०९ धावांचा पाठलाग करताना सूर्यकुमार यादवने ३७ चेंडूत ८२ धावांची खेळी केली. विजयानंतर ड्रेसिंगरुममध्ये परतल्यानंतर एका माणसाला वाकून नमस्कार केला. सोशल मीडियावर या नमस्काराची आणि व्हीडिओची प्रचंड चर्चा आहे.



कर्णधार सूर्यकुमारने संघाला जिंकून देणारी खेळी केल्यानंतर थ्रोडाऊन स्पेशालिस्ट रघू यांना वाकून नमस्कार केला. सूर्यकुमारच्या या कृतीने रघूही भारावून गेले. त्यांनी आशिर्वाद देत सूर्यकुमारला आलिंगन देत अभिनंदन केले व शुभेच्छाही दिल्या.

सूर्यकुमार गेले वर्षभर धावांसाठी झगडताना दिसला होता. शुक्रवारी त्याने सव्वा वर्षानंतर अर्धशतकी खेळी साकारली. यादरम्यान अनेकदा सूर्यकुमारला फॉर्मविषयी प्रश्न विचारण्यात आले. त्या वेळी तो म्हणाला होता की, मी नेटमध्ये खूप चांगला खेळतो आहे. धावा लवकरच होतील. अखेर सूर्यकुमारने त्याचा प्रत्यय घडवला.

धावा होत नसतानाच्या काळात रघू यांनी सूर्यकुमारला खूप मदत केली आहे. थ्रोडाऊन स्पेशालिस्ट रघू खास मशीनच्या माध्यमातून फलंदाजांना उसळत्या चेंडूंचा सामना करण्यासाठी तयार करतात. अधिकाधिक वेगाने उसळते चेंडूंचा सराव ते करून घेतात. भारताने आशिया चषक जिंकला होता त्या वेळी युवा तिलक वर्माने करंडक उंचावला. त्यानंतर संघाने करंडक रघू यांच्याकडे सोपवला होता. भारतीय फलंदाजांना स्लिंगरने नेटवर थ्रो–डाउन देणे हे त्याचे काम आहे.

# मिशन ऑलिम्पिक कुस्ती स्पर्धेत मच्छीमाराच्या मुलाने जिंकले ‘सुवर्ण’

## चैतन्य साळुंखेने मलेशियाच्या पैलवानास केले चारीमुंड्या चीत



**मायणी : प्रतिनिधी**

खटाव तालुक्यातील मायणी येथील मच्छीमाराचा मुलगा पैलवान चैतन्य साळुंखे याने ७९ किलो वजनी गटामध्ये थायलंड येथे झालेल्या मिशन ऑलिम्पिक कुस्ती स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करून आंतरराष्ट्रीय फ्री स्टाइल चॅम्पियन कुस्ती स्पर्धेमध्ये डाव साधून सुवर्णपदक प्राप्त केले आहे तसेच पुढील वर्षी होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी एक आशेचा किरण निर्माण करून देशाचे व गावचे नाव अटकेपार नेले आहे.

मायणीचा सुपुत्र पैलवान चैतन्य मच्छिंद्र साळुंखे याने वयाच्या १५व्या वर्षापासून कुस्ती स्पर्धेत सहभाग घेण्यास प्रारंभ केला. त्याने यापूर्वी तालुका व जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक, तर राज्य पातळीवरील कुस्ती स्पर्धेत त्याने रौप्यपदक प्राप्त केले आहे. देशांतर्गत बेळगाव येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत ७९ किलो वजन गटात सुवर्ण व सन २०२४मध्ये झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ६५ किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

थायलंड येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत त्याने कझाकिस्तान व उज्बेकिस्तान या देशातील पैलवानांचा पराभव करून अखेरच्या कुस्तीत मलेशियाच्याच पैलवानास चारीमुंड्या चीत करून सुवर्णपदक खेचून आणले.

पैलवान चैतन्यचे शिक्षण मायणी येथील प्राथमिक शाळा व भारत माता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे झाले असून तो सध्या बारावीमध्ये कला शाखेत शिक्षण घेत आहे. वडील मच्छिंद्र साळुंखे हे मच्छीमारीचा व्यवसाय करून प्रपंच चालवितात. अत्यंत आर्थिक अडचणीची परिस्थिती असतानादेखील त्यांनी यावर मात करून आपल्या मुलाला पैलवान बनवण्यात मोलाचा वाटा उचलला.



# आयपीएलसाठी धोनी लागला तयारीला

**चेन्नई** : कॅप्टन कूल महेंद्रसिंह धोनी पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात उतरण्यासाठी सज्ज झाला आहे. चेन्नई सुपर किंग्सच्या ताफ्यातून तो पुन्हा एकदा आयपीएलमध्ये खेळताना दिसणार आहे. आगामी स्पर्धेसाठी धोनीने तयारीही सुरु केली आहे. या स्टार खेळाडूचा सरावादरम्यानचा एक व्हिडीओ समोर आला आहे. सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे.

झारखंड राज्य क्रिकेट संघाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून धोनीच्या नेट प्रॅक्टिस सेशनचा एक छोटा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये धोनी पॅड्स घालताना दिसतो. व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये पाहा कोण परत आलं आहे असं कॅप्शन लिहिले आहे. जेएससीएचा अभिमान, महेंद्रसिंह धोनी असा उल्लेखही या पोस्टमध्ये केल्याचा दिसतो.

नेट्समध्ये सरावाला सुरुवात करण्याआधी धोनी माजी भारतीय फलंदाज आणि जेएससीए अधिकारी सौरभ तिवारी यांच्याशी संवाद साधताना दिसला. आयपीएल २०२६ची सुरुवात २६ मार्चपासून होण्याची शक्यता आहे. यंदाच्या हंगामातील अंतिम सामना हा ३१ मे रोजी खेळवला जाऊ शकतो. यंदाच्या हंगामात धोनी पुन्हा एकदा मैदानात उतरणार आहे. यंदाचा हंगाम कदाचित त्याच्यासाठी अखेरचा ठरू शकतो.

# राज्यस्तरीय शूटिंगबॉल स्पर्धेत मालेगाव संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मॉडेल संघ रांजणखारतर्फे आयोजित राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत आयएससी मालेगाव संघाने विजेतेपद पटकाविले. स्पर्धेत रायगड जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, मालेगाव येथील संघांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे चेअरमन चंद्रकांत मोकल यांच्या हस्ते झाले. ग्रामपंचायत सदस्य दीप्ती पाटील, मंडळाचे सल्लागार ॲड. भालचंद्र पाटील, अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, उपाध्यक्ष रमाकांत पाटील, पदाधिकारी मंगेश पाटील सतीश म्हात्रे व इतर सदस्य, पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

द्वितीय क्रमांक जयंत घोरपडे संघ सोलापूर, तृतीय क्रमांक विद्युत संघ मांडवखार, चतुर्थ क्रमांक इस्तियाक संघ मालेगावने प्राप्त केला. क्रमांक एक ते आठपर्यंत सर्व विजेत्या संघांना पारितोषिक व ट्रॉफी देण्यात आली तसेच उल्लेखनीय खेळी केलेल्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण शिवसेना नेते दिलीप भोईर, राष्ट्रवादीचे अमित नाईक, उद्योजक रणजीत म्हात्रे, शंकर मोकल, नंदन पाटील, विशाल जुईकर, ज्ञानेश्वर पाटील, सरपंच उदय म्हात्रे, डॉ. जगन्नाथ पाटील व मंडळाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com